# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ | अकोला रविवार ता० १३ माहे जुलै सन १८७९ इसवी | अंक २७


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.
## सुबोधसार भाग पहिला.

त्रैले[...]धपतीचे कांहीं नियम असे आहेत कीं, परस्पर वस्तुंचा अथवा प्राण्यांचा स[...] अथवा संयोग होतांच एकमेकांचे गुणांत न्यूनाधिकपणा तात्काल उत्पन्न होतो, हें समजण्याकरितां प्राचीन काळचे विद्वज्जनांनीं अति श्रम घेऊन लोक कल्याणार्थ अनेक विषयांचीं तत्वें निवडून जगापुढें ठेवलीं आहेत. त्यांच्या अवलोकनानें धर्म, न्याय, चातुर्य, कलाकौशल्य, रीतिभाति, वगैरे प्रकार समजण्यास ग्रंथरूपी आरसेच आहेत, यांत संशय नाहीं. अशा ग्रंथांचें अवलोकन न होणाऱ्या पुरुषांस व्यवहारज्ञान वगैरे विषयांची माहिती कोठून होणार? मग अर्थातच तशा मनुष्यास अनेक प्रकारच्या विपत्ती भोगाव्या लागतात. सारांश प्राचीन काळचीं शास्त्रें वगैरे जीं आहेत तीं ध्यानांत बाळगण्या सारखीं आहेत. परंतु सांप्रतकाळीं लोक सर्व प्रकारें अतिनिकृष्ट दशेप्रत येत असल्यानें सर्व वेळ राबले तरी उदर भरण्याचें नित्यकृत्य संपत नाहीं. अशा मनुष्याला वरील सर्व ग्रंथांचें अवलोकन अथवा श्रवण होण्याचा कधींच संभव नाहीं. याकरितां साधारण व्यवहारज्ञान होण्यास सुभाषित हा विषय बरा आहे, असें जाणून अनेक विद्वानांच्या सहायानें राजनीति वगैरे सुभाषित ग्रंथ अवलोकनांत आणून त्यांतील नीतिपर, बोधक, मनोरंजक, आणि दृष्टांतिक असे जे उपयुक्त श्लोक दिसले तेवढेच घेऊन हा ( सुबोधसार ) नांवाचा एक लहानसा ग्रंथ तयार केला आहे. त्यांतील श्लोक प्राचीन काळचे महाकवींनीं अनुभविक व दृष्टांतपर असे केलेले आहेत; व त्यांची योजना आह्मीं अशी केली आहे कीं, प्रथम श्लोक त्याचे खालीं प्राकृत अर्थ आणि त्याचे खालीं एकंदर श्लोकाचें व अर्थाचें खुलासेवार तात्पर्य आणि [...]तकरून सर्व श्लोक सर्व ज्ञातीस व धर्मास सारखे लागू पडण्यास योग्य असून चित्तवेधक, बोधक, दृष्टांतपर, व अनुभवसिद्ध असे आहेत. अशा ग्रंथाच्या अवलोकनानें बहुतेक व्यवहारज्ञान वगैरे विषयांची चांगली माहिती होऊन, सामान्य पुरुषासही व्यवहारांत कसें बोलावें व वागावें वगैरे अनेक प्रकारचें ज्ञान होण्या सारखें आहे; यास्तव सुज्ञ जनांनीं या पुस्तकाचा संग्रह अवश्य करावा अशी आमची विनंती आहे. हा ग्रंथ खिळे छापानें छापून लवकरच प्रसिद्ध होईल. याची किंमत अगाऊ आठ आणे व बुक बंगी व पोष्टाबद्दल एक आणा एकूण नऊ आणे ठेविली आहे, परंतु जितके वर्गणीदार मिळतील तितक्याच प्रति काढण्याचा इराद आहे जे लोक आह्मांस ओळखतात त्यांस पूर्वी आह्मी दुसरे ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत ह्याची खात्री असल्यानें अगाऊ वर्गणी देण्यास मागें पुढें पाहणार नाहींत, परंतु अपरिचित लोकांनींही अगाऊ वर्गणी देण्यास शंका घेऊं नये. कारण कांहीं ग्रंथकर्ते अगाऊ वसूल करून स्वस्थ बसतात; परंत तसा प्रकार एथें मुळींच नाहीं, असें आह्मी खात्रीपूर्वक कळवितों. वर्गणीदारांनीं आपलीं नांवें व अगाऊ वर्गणी खालीं सही करणाराकडेस अथवा रा. रा. खंडेराव बाळाजी वऱ्हाडसमाचार कर्ते यांजकडेस द्यावी. कळावें ता. ९ माहे जुलाई सन १८७९ इ.

रंगनाथ सखाराम किकवीकर
स्टेशनमास्तर वरणगाव,
जिल्हा खानदेश.

## थोर पुरुषांचे आणि स्त्रियांचे पोवाडे.

हें पुस्तक रा. रा. शंकर तुकाराम शाळिग्राम यांनीं पुण्यास नुकतेंच छापिलें त्याच्या प्रति वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किंमत दीड रुपया व बाहेर गावीं नेणारास तीन आणे टपालसंबंधी खर्च पडेल

या पुस्तकांत शिवाजी महाराजांचा, निरनिराळ्या पेशव्यांचे, लढायांचे, शूरांचे व सद्गुणी स्त्रियांचे, तसेच पंढरपुर, तुळजापुर, व्यंकटगिरि, पुणें, बेलबाग, तुळसबाग, पर्वती यांजवर पवाडे आहेत. कांहीं कांहीं पोवाडे तर एकाच प्रकरणावर कित्येक आहेत. सवाई माधवरावावर २, नानाफडणिसावर २, अहिल्याबाईवर २, खर्ड्याच्या लढाईवर ५, व शेवटचे राव बाजीवर ८ पोवाडे आहेत.

## कुटुंब मैत्रा.

शरीरास अपाय घडले असतां तत्काल योजण्याचे उपाय यासंबंधी हें उपयुक्त पुस्तक मिसेस रेबिका सिमियन नावाची इस्रायल स्त्री जी मुंबईच्या ग्रांट मेडिकल कालेजांत पास झालेली सुईण आहे तिनें नवीन तयार केलें त्याची दुसरी आवृत्ति छापून तयार झालेली आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस तयार आहे. किंमत सहा आणे. बाहेर गावीं मागणारास एक आणा अधिक पडेल.

## महामारी.

हा भयंकर रोग सर्वत्र प्रसिद्ध आहे त्या विषयीं चांगली माहिती होणें व त्यावर वक्तशीर उपाय योजणें फार अवश्यक आहे. ह्मणून मिरज संस्थानचे मेडिकल आफिसर रा. रा. त्रिंबक सखाराम सिरवलकर एल एम. यांनीं या विषयावर एक लहानसें उत्तम पुस्तक तयार केलेलें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहे. किंमत सहा आणे. बाहेर गावीं नेणारास एक आणा अधिक पडेल.

## कृषिकर्मविद्या अथवा शेतीचें वर्णन.

हा सुमार साडेपांचशें पृष्ठांचा मराठी ग्रंथ ग्रंथोत्तेजक मंडळीकडून नुकताच छापून तयार झालेला प्रसिद्धीस आलेला आहे. हा विषय मोठ्या महत्वाचा असून ग्रंथांतील माहिती फार शोधकपणानें लिहिलेली आहे. याच्या प्रति वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. किंमत ३॥ रुपये व डांकहशील ०४ आणे पडेल.

## जाहिरात
COMEDY OF ERRORS.
## कामर्डी आफ एरर्स.
अथवा.
## भ्रांतिकृतचमत्कार

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरलेला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे. असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्ध आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## बापूगोखल्याचें चरित्र

जुन्या बखरीचे आधारानें हें नवीन उत्तम पुस्तक रा. रा. शंकर तुकाराम शालिग्राम यांनीं पुण्यास तयार केलेलें आमच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आलें आहे. याची किंमत १ रुपया असून डाकहशील एक आणा आहे. अगदी अलीकडील ह्मणजे पेशवाईअखेरच्या या शूर पुरुषाचें नाव सर्वत्र महशूर आहे सबब त्याचें यथार्थ व साद्यंत चरित्र बहुतांस वाचावयास व संग्रहीं बाळगण्यास उत्साह असेल ह्मणून आह्मी मुद्दाम याच्या प्रति विक्रीस आणविल्या आहेत. सर्वांस कळावें तारीख १८ माहे डिसेंबर सन १८७८

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## अनंत फंदीच्या लावण्या.

हीं पुस्तकें रा. रा. शंकर तुकाराम शाळिग्राम यांनीं केलेलीं आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आलीं आहेत. यांत अनंतफंदीचा इतिहास, माधवग्रंथ व लावण्या आहेत. याची किंमत आठ आणे आहे. डाक खर्च २ आणे शिवाय पडेल.

## नोटिस.

रा. चंद्रभान व सूर्यभान वल्लद नारायणजी ठाकरे राहणार खोपडी परगणें पिंजर तालुके अकोलें यांस सितारामसा गोविंदसा लाड दुकान पातूर नंदापुर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं. तुह्मी उभयतांनीं आह्मां पासून शंभर १०० रुपये कर्जाऊ घेऊन रोखा लिहून दिला आहे. त्यांतील करारांप्रमाणें रुपये अजून दिले नाहींत. पुष्कळवेळा मागणें केलें असतां देऊ दिलाऊ करिता परंतुं रुपये देत नाहीं सबब मुद्दाम ही नोटिस दिली. तर नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत व्याजासुद्धां सर्व रकमेचा उलगडा करावा. नाहीं पेक्षां कोर्टांत दावा लावून खर्चासुद्धां रुपये घेण्यांत येतील व या नोटिशीचा खर्च ही तुह्मास द्यावा लागेल कळावें. तारीख ११ माहे जुलाई सन १८७९ इसवी.

( सही ) सितारामसा गोविंदसा लाड
दस्तूर खुद,

## नोटिस.

मंजाई मर्द जयराम रहाणार आगर तालुके अकोला ईस खालीं सही करणार याजकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येते कीं, तुझी नोटिस तारीख २९।६।७९ ची वऱ्हाडसमाचारांत दिली ती पावली. विनाकारण तूं नोटिस दिली व अशी नोटिस दिल्यानें तुला मजकडून खर्चाबदलचे रुपये कधींही मिळणार नाहींस. व दुसरा नवरा करण्यास तूं कधींही पात्र होणार नाहींस. कारण माझा बाप तुला नेण्याकरितां ४।५ वेळां आला असून तुझे आई बाप पाठवीत नाहींत इतकेंच नाहीं तर विनाकारण माझ्या बापाचा अपमान करितात. पंचाचा मजकूर अगदी खोटा लिहिला आहेस. असो. आतां तुला नोटिसीनें कळवितो कीं ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आत तूं मजकडे ह्मणजे माझे घरीं संसार करण्यास यावें माझी अगदी तक्रार नसून मी नांदविण्यास राजी आहे. जर तूं मुदतीप्रमाणें माझे एथें न आलीस तर तूं खर्चाचा बोजा मजवर विनाकारण ठेवतेस असें सिद्ध होईल. मी खर्चाबदल जबाबदार रहाणार नाहीं. व माझे परवानगी शिवाय तूं दुसरा नवरा करशील तर मी कायद्याप्रमाणें तजवीज करीन हें खूप समजावें. तारीख ४ जुलै सन १८७९ इसवी.

( सही ) जयराम वल्लद भगवान सुतार
वस्ती कसबे बाडेगाव तालुके
बाळापुर निशाणी खुद्द रेघ.

### नोटिस.

रा. रामचंद्र लक्ष्मण कुळकर्णी रहाणार मौजे खिरपुरी बुजरुख तालुके बाळापुर यास चंद्रभान वल्लद लक्ष्मण गावंढे खिरपुरीकर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुह्मी तारीख २ माहे जुलाईची आह्मास नोटिस दिली ती पावली तिचा जबाब येणें प्रमाणें:-

सर्वे नंबर ११९ चें शेत ९ वर्षांचे करारानें अह्मांस वहितीस दिलें होतें ह्मणून तुह्मी लिहिलें ती गोष्ट खोटी आहे. तुमचे वडिलांनीं हा नंबर ५० वर्षांचा पडीत असून आह्मीं व दुसरे ४ इसम यांजकडून त्याची दहा-वर्षां पूर्वीं नांगरटी काढविली व ती बिन मुदत ह्मणजे तुमचे आमचे जिवांत जीव आहे तोंपर्यंत चालणारी आहे. व ही गोष्ट साऱ्या गावास ठाऊक आहे. असें असतां तुह्मी दंडेलीनें ९ वर्षांचा करार सांगता तो बातल असे. या शेतांत ६ जोड्यांची भागणी आहे त्यांत एक जोडी तुमचीः दोन जोड्या माझ्या, एक जोडी जानजी गावंढे याची, एँक शिवराम गावंढे याची, व एक कुकाजी सांगोकर माळी याची आहे. व हे सर्व लोक तहाहयातीच्या करारानें हा नंबर करीत आहेत. व इतक्याच्या भागणी यांत शेरीक केल्या आहेत असे तुमचे बापानें आह्मांस सांगितलें होतें; पण तुमचे मनांतले हल्लींचे कपटावरून सरकारी कागदांत भागणी शरीक केल्या नाहींत असें दिसतें. असो. आह्मीं तुह्माला सदरी लिहिलेलें सर्व कारणावरून शेत स्वाधीन करून देत नाहीं. तें आमच्या हक्काचें आहे. व त्यांत सालमजकूरचा खरीपाचा पेरा आह्मी केला आहे. तुह्मी फिर्याद वगैरे केल्यास आह्मी तुमच्या खर्चाचे जबाबदार होणार नाहीं. व हा जबाब देणें तुह्मी आह्मास भाग पाडलें. सबब याचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख १२ माहे जुलाई सन १८७९ इसवी.

( सही ) चंद्रभान वल्लद लक्ष्मण गावंढे याचे हातची रेघ.

---

## वऱ्हाडसमाचार

---

मिति आषाढ वद्य ९ शके १८०१

---

## नेटिव इंजिनियर.

विद्याही शिकेल त्याची आहे. डाक्टरी, इंजनेरी वगैरे मोठीं शास्त्रीय व बुद्धिमत्तेचीं कामें युरोपियन लोकांसच येतात व नेटिवांस तीं येत नाहींत असें नाहीं, इतकेंच कीं, पुष्कळ दिवस सरकारानें असलीं महत्वाचीं कामें नेटिवाकडे सोंपवून त्यांचे शहाणपणाची परीक्षा पाहिली नव्हती, पण आतां तीं सरकार त्यांस देऊं लागलें व तेणें करून आमचे नेटिवांचे हुशारीचा प्रभाव लोकदृष्टीपुढें येऊं लागला आहे. पहा, वऱ्हाडांतील विद्याखात्याच्या डायरेकटरचें काम पुष्कळ वर्षें युरोपियन गृहस्थाकडे होते त्या मुळें नेटिवांस तें करितां येईल कीं, नाहीं याविषयीं सरकारास संशय वाटत होता पण तें काम उत्तम प्रकारें करून रा. ब. नारायणभाई दांडेकर यांनीं नेटिवांच्या योग्यतेविषयीं सरकारची व इतर सर्वांची खात्री करून दिली. अशीच कित्येक खात्याकडे नजर टाकिली असतां नेटिवांची योग्यता दिसून येते व त्याकरितांच सरकार आलीकडे नेटिवांस मोठमोठाल्या महत्वाच्या जागा देऊं लागलें आहे ही संतोषाची गोष्ट आहे.

आज ही गोष्ट आह्मांस आठवण्यास काठेवाडांतील धाराजीजवळचा पूल आमचे एक नेटिव इंजनेराचे देखरेखीनें तयार झाला व त्याबद्दल त्याची तारीफ झाली हें कारण होय. सबब त्याविषयींची हकीकत थोडक्यांत देतो.

राजकोटाहून पेरिबंदरास जाण्याचे रस्त्यावर धाराजीचे स्टेशनापासून ३ मैलांवर भदर ह्मणून नदी आहे तिजवर पूल बांधण्याचा सरकारचा विचार झाला. व सन १८७५ चे मार्च महिन्यांत त्याच्या पायाचा दगड ठेवण्याचा समारंभ त्यावेळचे पोलिटिकल एजंट मि० पील साहेब यानीं केला व त्याचे स्मरणार्थ "पील पूल" असें त्याचें नाव ठेविलें आहे. तो पूल हल्लीं पुरा होऊन लोकांचे उपयोगार्थ या महिन्याचे १० वे तारखेस मोठा समारंभ करून मोकळा केला. त्यावेळीं लोक सुमार ६००० आले होते. मेजर स्काट सा. यानीं आरंभीं भाषण केलें त्यांतील तात्पर्य.:—

सन १८७५ सालीं मि. पील साहेबानीं या कामाचा आरंभ केला ह्मणून त्यांचेंच नाव या पुलास दिलें आहे. या पुलाचा नकाशा व पुढील सर्व काम मि० गणेश गोविंद संस्थानचे इंजिनियर यांनीं केलें आहे. दुसऱ्या कोणाचीही या कामीं मदत त्यांनीं बिलकूल घेतली नाहीं. या पुलाला ६० फुटाची एकक अशा ११ कमानी आहेत. पुलाची खोली पाण्याचे सपाटी खालीं ११ फूट व कोठें १६ फूट आहे. लांबी ९०० फूट व पुलाची रुंदी १९ फूट ४ इंच आहे. आणि उंची ६० फूट आहे. असें मोठे व उत्तम काम नेटिव गृहस्थाच्या हातून कोणाची सला मसलत किंवा मदत न घेतां होणे ह्मणजे महत्वाची गोष्ट समजली पाहिजे. व हें गणपतराव यांस मोठें भूषण होय. व याचा त्यानीं अभिमान बाळगणें योग्य होय. या पुलाचें काम मोठें मजबूद व भव्य आणि उत्कृष्ठ झालें आहे हें गणपतरावांच्या कीर्तीस शोभा देणारें आहे. याला खर्च सवा दोन लक्षावर कांहीं अधिक लागला आहे. हा पूल या देशच्या व्यापारास फार सोयीवार झाला आहे. काठेवाडचा व्यापार दिवसानुदिवस वाढत आहे व तो आतां रेल्वे व हा पूल यांचे योगानें थोडे वर्षांत दसपट वाढेल यांत संशय नाहीं. गणपतराव यांस या कामाचे भूषणार्थ दरबारानें ७५० रुपये बक्षीस देण्याचें ठरविलें आहे आणि आह्मी आणखी २०० रुपये त्यांस त्यांचे हाता खालील लोकांस वगैरे देण्याकरितां मोठ्या खुशीनें देतो.

नंतर कर्नल बार्टन पोलिटिकल एजंट यांनीं भाषण केलें त्यांत गणपतराव यांस कामाबद्दल मोठी शाबासकी दिली. व त्यांचे नावानें सर्व जमलेल्या मंडळीनीं तीन वेळां गजर करावा असें ह्मटलें त्याप्रमाणें सर्व लोकांनीं आनंदानें त्रिवार टाळ्या पिटल्या! नंतर ते पुलावरून पलीकडच्या बाजूपर्यंत चालत गेले आणि सर्व लोकांचे उपयोगार्थ पूल मोकळा केला असें त्यांनीं सांगितलें. नंतर पान सुपारी अत्तर गुलाब हार तुरे गजरे वाटून समारंभ समाप्त झाला व लोक घरोघर गेले.

---

## झुलू प्रकरण.

अलीकडे झुलू लोकांच्या गडबडीविषयीं कांहीं खबर नाहीं. इंग्लिश सरकारच्या फौजा त्यांचे मुलखांत चाल करून बऱ्याच पुढें गेल्या आहेत. पण आतां झुलू लोकांचा राजा तह करण्याविषयीं झटत आहे असें कळतें. १५ दिवस लढाई तकूब रहावी असें ठरलें आहे एवढ्यानेंही बराच फायदा होईल कारण या लढाईप्रीत्यर्थ महिना ५० लक्ष रुपये सरकारास खर्च येत आहे. तहनाम्यापूर्वीं इंग्लिश सरकारानीं झुलू राजास काय करणें अवश्य असल्याचें कळविलें. आहे तें हें कीं इंग्लिश सरकारच्या २ तोफा व बैल इसांडुला एथून झुलू लोकांनीं नेले आहेत ते आपले वकीला बरोबर आमचे छावणींत परत पाठवून द्यावे. लढाइ उत्पन्न झाल्यापासून आजपर्यंत आमचीं हत्यारें झुलू लोकांनीं घेतलीं आहेत तीं परत देण्याचें वचन द्यावें. व झुलू लोकांची पलटण ब्रिटिश छावणींत आणावी व तिचीं हत्यारें काढून घ्यावीं. इतक्या गोष्टी कबूल झाल्या ह्मणजे तहनामा होणार आहे.

---

## पर्जन्य.

अकोल्यास दोन आठवडे झाले पर्जन्य बिलकूल नाहीं. जोंधळ्याचे पेरणीस त्याची फार जरूर असून त्यावाचून लोक हवालदील झाले आहेत. गारवा सुटतो, ऊष्मा पुष्कळ होतो, गार पाण्यावर इच्छा धावते, रात्रौ नभोमंडळ स्वच्छ असून नक्षत्रे टळटळीत दिसतात, हीं चिन्हें या दिवसांत लोकांचे अतःकरणांत भय उत्पन्न करिताहेत आतां या आठवड्यांत काय होतें पहावें. परमेश्वरानें लवकर कृपा करावी अशी त्यास आमची प्रार्थना आहे. नागपुराकडेही पर्जन्य चांगला नसल्याची गेल्या आठवड्यांत खबर होती. हल्लीं कसा प्रकार झाला आहे तो समजला नाहीं. इलिचपुर उमरावतीकडे इतका बेभाट नाहीं. वाशीमाकडे पाऊस विशेष पडला असेल असें दिसत नाहीं; कारण नदीला या आठवड्यांत पाणी चढलें नाहीं.

खानदेशांत आर्द्रा नक्षत्राचा पाऊस चांगला पडला. पण किड्यांचा बेभाट झाला आहे. पेरलेलें बी किडे उकरून काढतात असें समजतें. नाशकाकडे व नगराकडे पाऊस बरा आहे. तसाच गुजरार्थेत, कोंकणांत व पुण्याकडे पाऊस चांगला पडला ही आनंदाची वार्ता. सोलापुराकडेही या वर्षीं पर्जन्य पडून पेरे झाले आहेत. पण तिकडे उंदरांचा उपद्रव गुदस्तांप्रमाणें पुन्हा सुरू झाला आहे. हें पाहून वाईट वाटतें. सरकारानें त्यांचा नाश करण्यासाठीं उत्तम उपाय योजण्याचें काम डा. थिओडोर कुक साहेब यांस सांगितलें आहे, ते लवकरच कांहीं तजवीज काढतील तर चांगलें होईल. नाहीं पेक्षां उंदिरांनीं मुळांतच पेरणीचा नाश केला ह्मणजे हा चवथा दुष्काळ तिकडील लोकांस वर्षभर सोसावा लागेल. कृपाळु परमेश्वर असें न करो, व डाक्टर साहेबांचे योजनेस यश येवो असें आह्मी मनापासून इच्छितों.

---

हिंदुस्थान सरकारचे हाताखालीं तीन सेक्रेटरी होते त्यांतील एक कमी करून दोन ठेविले. व मि० ह्यूम यांस वायव्य प्रांताकडे रिविन्यु बोर्डांत जागा देण्याचा ठराव केला. आतां दोन सेक्रेटरी राहणार त्यांत एकाकडे फिनान्स व कामर्स हीं खातीं व दुसऱ्याकडे होम, रिविन्यु, आणि अग्रिकल्चर हीं खातीं ठेवून त्या त्या कामांची व्यवस्थित वाटणी केल्याविषयीं सरकारचा ठराव प्रसिद्ध झाला आहे. व या गोष्टीपासून तूर्त ५०४०० रुपयांचा सरकारचा फायदा झाला आहे. व अठरा महिन्यानंतर पुन्हा या खात्याचा विचार होईल तेव्हां त्यांतील छापखान्यासंबधी व क्लार्क कमी करण्यासंबंधी मिळून पुष्कळ सेव्हिंग केलें जाईल. असें प्रसिद्ध झालें आहे.

---

## वऱ्हाड.

पर्जन्य अगदी नाहीं. लोक फार काळजी करीत आहेत.

मि० एदलजी बहिमनजी साहेब आसिस्टंट कमिशनर या आठवड्यांत खामगावास गेले होते. अफूच्या उत्पन्नाविषयीं व खरेदी विक्रीविषयीं वगैरे तपास करण्याचा या जाण्यांत त्यांचा उद्देश होता असें कळतें.

मि० डेविस साहेब असिस्टंट कमिशनर शुक्रवारीं रजिस्टर तपासणी करितां खामगावास गेले आहेत. आज परत येतील.

रा. रा. काशिनाथ शंकर राजे उदाराम यांस जळगावास नायब तहाशिलदार नेमिलें व तिकडे रुजू होण्याकरितां ते एथून निघून गेले. रा. रा. नरसो यशवंत सरकारी कामानिमित्त एक दोन दिवस एथें आले होते ते काशीनाथराव यांस च्यार्ज देण्याकरितां पुन्हा परत गेले. आतां लवकरच माघारे येतील. हे गृहस्थ उत्तम हुशार व बहुत दिवसांचे नोकर असतां यांस नायब तहाशिल्दारी कायमची मिळत नाहीं हें पाहून आह्मांस वाईट वाटतें.

एथून दोन कोसांवर कान्हेरी ह्मणून गाव आहे तेथील पाणी नळानें अकोल्यास येण्याजोगें आहे असें ह्मणतात त्या साठीं मे० दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. हे या आठवड्यांत दोन वेळां तेथें पहाण्यास गेले होते. एक वेळीं लोकल फंड ओव्हरसियर रा. रा. सदाशीव विष्णु भागवत व दुसरे वेळीं मि० क्रेग साहेब इंजिनियर त्यांच्या बरोबर होते. त्यास काय झाला तो अजून कळला नाहीं.

मि० नारायण केशवराव देशपांडे यांस इलिचपुर जिल्ह्यांत अंजनगावास सब रेजिस्ट्रार नेमिलें.

---

क्या. बाइल्यू फर्स्ट ग्रेड एकझिक्युटिव इंजिनियर १२ महिन्यांचे रजेवर गेले त्यामुळें खालीं लिहिलेली वर्गावर्गी झाली आहे.

मि० जे क्रेग थर्ड ग्रेड एँ० इंजिनियर सेकंड ग्रेड झाले— क्या० एच सी. फाक्स आर. ई. फोर्थ ग्रेडचे थर्ड ग्रेड ए० इंजिनियर झाले— मि० टी लाब फर्स्ट ग्रेड असिस्टंट इंजिनियर हे फोर्थ ग्रेड ए० इंजिनियर झाले– मि० जे. के. बाटूस सेकंड ग्रेड असिस्टंट इंजिनियर हे फर्स्ट ग्रेड असिस्टंट इंजिनियर झाले.

---

कर्नल अलेकझांडर सुप्रिंटेंडिंग इंजिनियर रजेवरून परत आले.

---

मि० हाबसन साहेब असिस्टंट पोलिस सुप्रिंटेंडेंट यांस वाशिमास ४ थे ग्रेडचे पोलिस सुप्रिंटेंडेंट नेमून मंजुराती करितां हिंदुस्थान सरकारास लिहून गेलें आहे.

---

खालीं लिहिलेले गृहस्थास स्पेशियल माजिस्ट्रेट नेमून तिसरे क्लासचे अधिकार दिले आहेत.

मि० सयद शहा अमीरुल्ला काद्री यांस वाशिमास, मि० यादवराव यांस उमरखेडास, मि० नारायणराव यांस इलिचपुर जिल्ह्यांत अंजनगावास, मि० भगवंतराव शंकर यांस दर्यापुरास, मि० सयद रोशन खान यांस कालगावास, व मि० महमद सुलेमान खान यांस सोलापुरास.

---

अकोल्याचे व खामगावचे स्माल काज जडजांस ५ वे ग्रेडचे सबार्डिनेट जडजाचे ५००० रुपये पर्यंत दावे पहाण्याचे अधिकार दिले. अकोला व खामगाम हे तालुके ज्यांचे त्यांकडे असून बाळापुर तालुका दोन्ही स्माल काज कोर्टांस वाटून दिला अहि.

---

हिंदुस्थान सरकारचा नवा स्टांप आक्ट सन १८७९ चा पहिला हा वऱ्हाडास लागू केल्या बदल हिंदुस्थान सरकारचा जाहिरनामा नंबर ११४ तारीख ४ जून सन १८७९ इसवीचा प्रसिद्ध झाला आहे. त्यांत वऱ्हाडाकरितां फेरफार केला आहे तो येणें प्रमाणें.:—

"लोकल गव्हर्मेंट" असे शद्ब या कायद्यांत आहेत त्याजागीं "रेसिडेंट हैद्राबाद" असें वाचावें. व "ब्रिटिश इंडिया" याजबदल "हैदराबाद असाइंड डिस्ट्रिक्ट" असें वाचावें. पहिले कलमाचे शेवटले पारिग्राफांत व ५ वे कलमाचे अ पोट कलमांत "एप्रिल" असा शद्ब आहे तेथें "जून" असें वाचावें. तसेंच ४६ वे कलमांत "सेंट्रल प्राव्हिन्सेस हे शद्ब आहेत त्यापुढें "हैदराबाद असाइंड डिस्ट्रिक्ट" हे शद्ब आहेत असें समजावें.

या आक्टोच आठवे कलमांत गवरनर जनरल इन कौन्सिल यांस जे अधिकार दिलेले आहेत त्यांचे आधारानें ते ठराव करितात कीं ब्रिटिश इंडियांतून हैदराबाद असाइंड डिस्ट्रिक्टमध्यें आलेल्या हुंड्यां व चेक यांवर स्टांप डयुटी पहिलीच पूर्ण लागली असेल तर ते दस्तैवज या प्रांतांत आल्यामुळें त्यांवर अधिक डयुटी घेणें मना केलें आहे.

---

रेल्वेविषयींचा सन १८७९ चा ४ था आक्ट वऱ्हाडास लागू केल्याबद्दल हिं. स. चा १३६ नंबरचा जाहिरनामा झाला आहे.

---

सिव्हिल प्रोसिजरचें कलम २६६ चे संबंधानें वऱ्हाडाविषयीं नंबर १४३ चा जाहिरनामा झाला आहे तो असा:—

वाडवडिलापासून वहितीस असलेलीं, किंवा प्रतबंदी झाल्यापासून वहीतीस असलेलीं, कोणा कडील शेतें किंवा त्यांस जोडून असलेलीं घरें किंवा इतर स्थावर यांची हुकुमनाम्यावरून विक्री व्हावयाची तर तिला रेसिडेंट साहेबांची मंजुरात पाहिजे. व कोणाचीं स्वसंपादित शेतें किंवा त्यांस जोडून असलेलीं घरें वगैरे स्थावर मिळकत याची विक्री व्हावयाची आहे तर तिला कमिशनर साहेबांची मंजुरात पाहिजे.

---

स्टांप कागदावर मजकूर लिहिणें तो फार असेल तर त्याला खालीं साधा कागद जोडण्यास हरकत नाहीं असा हिं. स. नें नंबर ९९६ चा जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे. व हुंडीला मात्र जोड कागद लावू नये असें त्यांत ठरविलें आहे.

---

कर्नल बुशबी साहेब बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर विलायतेहून रजेवरून परत यावयास निघाले. या आठवड्यांत एथें येतील.

---

इकडे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनरचे २५० रुपयाचे जागेवर कोणी बाहेरून गृहस्थ येणार आहेत असें आमचे बधू उर्दूअकबार कर्ते यांस समजलें आहे. इकडून मि० भास्कर सखाराम जयवंत जुडिशियल कमिशनर साहेबांचे क्लार्क आफ धि कोर्ट यांची बरेच दिवसांमागें शिफारस झाली आहे, व त्याप्रमाणें त्यांनां या प्रसंगीं ही जागा मिळावी हें रास्त आहे. सबब अलिशान रेसिडेंट साहेब त्यांवर दुर्लक्ष्य करणार नाहींत असें आह्मी इच्छितों.

---

मि० टी रंगराव हैदराबादचे अव्याची यांची वऱ्हाडांत नेमणूक होऊन ते लवकरच इकडे येणार आहेत असें समजतें.

---

रा. रा. वामनराव गोविंद जमादार वादी व मि. मुबारक अल्ली तहाशिलदार प्रतिवादी यां दरम्यान एथें दिवाणी मुकदमा ३० वेतारखेस चालणार आहे असें समजतें.

---

उर्दूअखबारावरून समजतें कीं, वऱ्हाडांत वकीली करण्याविषयीं परवानगी मिळावी ह्मणून मि० बमनजी फिरोजशा. व रा. रा. श्रीनिवास नरसिव्ह मुधोळकर यांची जुडिशियल कमिशनर साहेबानीं रेसिडेंट साहेबाकडे शिफारस केली आहे व रा. रा. दिनकर गंगाधर भट यांनां वऱ्हाडांत वकीली करण्यास येण्याविषयीं रेसिडेंट साहेबानीं परवानगी दिली आहे.

---

मेजर युएन स्मिथ साहेब हैदराबादचे फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट यांची मस्कत एथें नेमणूक झाली व ते तिकडे गेले व त्यांचें काम मि० फिटझरल्ड साहेब सी. एस हे पाहू लागलें.

---

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम ए हायस्कुलचे हेड मास्तर व रा. रा. वामनराव अनंत भोळे सुपर वाइझर हे मित्रमंडळीस भेटण्यासाठीं काल रोजीं एथें आले होते व आज परत गेले.

---

मि० अबदुल रहिमान अकोल्याचे चफि कानस्टेबल यांची इलिचपुरास बदली झाली व तेथील मि० एकरां हुसेन चीफ कानस्टेबल एथें येणार आहेत.

---

काल रात्रौ सांगलीकरांनीं मृच्छकटिक नाटक केलें तेंही पहिल्याप्रमाणेंच चांगलें झालें. लोकांची दाटी इतकी झाली होती कीं बसावयास जागा नसल्यामुळें शेकडो लोक उभे होते. बहुत लोक टिकिट न मिळाल्यामुळें परत गेले. बाहेर गांवाहूनही पुष्कळ लोक आले होते. शेवटीं टिकिटांचा दर दुप्पट केला तरी बहुत लोक तसे आले. व सर्व समाजाचें चांगलें मनोरंजन झालें हें पाहून आह्मास संतोष वाटला.

## वर्तमानसार.

नरसी केशवजी याजवरील मुकदमा पुन्हा सोमवार पर्यंत तकूब राहिला. सरकार त्यावर फिर्यादी होणार असा विचार चालला आहे.

पुण्यास बुकडेपो दोन केले. एक शुक्रवार पेठेंत व दुसरा लष्करी छावणींत.

रा. ब. केरो लक्ष्मण छत्रे डेकन कालेजांतील गणिताचे प्रोफेसर यांनीं पेनशनाचा अर्ज. केला त्यांचे जागेवर मि० जी डब्ल्यु फारेस्ट यांस नेमिले. व केरोपंत प्रिन्सिपालचें आर्कटिंग काम पहात होते त्या जागेवर मि० एफ जी. सिल्बी बी ए यांस नेमिलें.

नाशिकचे डिपुटी इन्स्पेक्टर, रा. रा. भास्करराव लिमये यांस बरतर्फ केलें त्यांचे जागेवर रा. रा. गोपाळ मोरेश्वर साठे बी ए यांस नेमिलें.

रा. सा. नारायण कृष्ण गोखले यांस कै० वामनराव अगारकर यांचे जागेवर नगरास डिपुटी इन्स्पेक्टर नेमिलें.

मि० गणपत व्यंकटेश लिमये बी ए यांस रत्नागिरीस डिपुटी इन्स्पेक्टर नेमिलें.

मुंबई इलाख्यांत रिविन्यू कमिशनर तीन आहेत पैकी मध्यभागचा एक कमी करणार.

विलायतेस अतिशय पावसामुळें गव्हाचा खराबा झाला. व गरीब लोकांस विपत्ती प्राप्त झाली तिचे निवारणार्थ तजविजी सुरू झाल्या आहेत.

काबूलचे अमिराशी इंग्लिश सरकारचा तह झाला त्या निमित्त इंदुरास होळकर सरकारानीं आनंदोत्साह केला.

बंगाल्याकडे दुष्काळ सुरू झाल्यासारखें झालें आहे.

रजपुताना रेल्वेस गेले आटवड्यांत अपघात झाला तेणेंकरून ४ गाड्या मोडल्या व ४० उतारू ठार मेले.

मद्रास व मुंबई एथील कम्यांडर इन चीफच्या जागा कमी कराव्या असा विचार निघाला आहे व त्या कमी करू नयेत. व त्या खात्यांतून दुसरे कित्येक कामदार कमी करण्याजोगे आहेत ते करावे असें टाइम्स वगैरे पत्रांचें मत आहे. कम्यांडर इन चीफ यांस कायम ठेवून सालिना ५ लक्ष रुपयांचें सेव्हिंग करितां येईल असें त्यांनीं पत्रांत लिहून त्याची तपसलिवार यादी दिली आहे.

मुंबईचे कौन्सलांतील सिनियर मेंबर मि० गिब्स साहेब यांस विलायतेस इंडिया आफिसांत जुडिशियल सेक्रेटरी नेमणार असें वर्तमान आहे.

वासुदेव बळवंत फडके दरोड्याचे प्रवर्तक काशीस जाऊन बैरागी होऊन नेपाळाकडे गेले असें वर्तमान आहे. कोणी ह्मणतात कीं, नाना साहेब आणि ते आतां तिकडे स्नान संध्या करीत बसतील !

अफगाणिस्थानांत युरोपियन व्यापाऱ्यांनीं गेले असतां त्यांस पास मिळत जावा. अशी तजवीज घाटत आहे.

पंढरपुर— आषाढी महाएकादशी निमित्त पंढरपुर येथें चालू सालीं सुमारें ७५००० यात्रेकरू जमले असून जत्रेंत रोगराई वगैरे कांहींएक न उद्भवतां सर्व लोक आपआपल्या गावीं सुरक्षितपणें परत गेले. म्युनिसिपाल कमिटीकडून शहर स्वच्छतेची व्यवस्था उत्तम प्रकारें ठेवण्यांत आली असून यात्रेकरू लोकांस राहण्याच्या सोयी वगैरे उत्तम केलेल्या होत्या. पोलिस बंदोबस्त चालीप्रमाणें होता. यात्रेकरू लोकांजवळून कर घेण्याबद्दलचा मक्ता चालू सालीं न देतां म्युनि० कमिटीनें काम कच्चेच ठेविलें होतें. धान्याची मेंहर्गता इतकी होती कीं, जोंधळ्याचे ८८१ शेर पिठास ८४ आणे प्रमाणें आकार लोकांस द्यावा लागला. पर्जन्यवृष्टि चांगल्या प्रकारची होऊन चंद्रभागा नदीस पाणी पुष्कळ आलें होतें. धान्यापैकीं मुगाचें पीक चांगलें टवटवीत आलें असून इतर पीकही चांगलें येईल अशी आशा आज मित्तीस आहे ह्मणून वगैरे हकीकत जत्रेस जाऊन आलेल्या लोकांकडून समजण्यांत आली आहे. ज्ञा. प्र.

आस्ट्रेलिया देशांत प्रदर्शन होणार आहे. तिकडे हिंदुस्थानांतून पदार्थ पाठविण्याची तयारी चालू आहे.

हांग क्यू एथें एका चिनी स्त्रीला ४ मुलें एके काळीं झाली. ही गोष्ट तेथील बादशहास कळविली आहे. त्याकडून तिला कांहीं इनाम मिळेल असें ह्मणतात.

सोन्याच्या खाणीवर कामें करण्या करितां ३०० कैदी देवाल एथें पाठविण्याचा विचार आहे.

ब्रह्मदेशांत रंगून एथें राजानें पुन्हा १०, १२ मनुष्यांचे जीव घेतले असें वर्तमान आलें आहे.

मुंबई इलाख्यांत सरकारच्या नवीन ठरावाप्रमाणें सहा हायस्कुलांचे जागीं शेती कामाची विद्या शिकविण्याकरितां सहा वर्ग स्थापन केले व त्यांवर मद्रास इलाख्यांतील सिदापेठ कालेजमधून पारशी विद्यार्थी तयार होऊन आले होते त्यांस मास्तर नेमिलें.

पुण्यांतील विश्रामबाग व बुधवार वाड्यास आगी लावण्याचे संबंधानें आणखी ३ गृहस्थ पकडले आहेत. त्यांत बाळाजी नारायण फडके हे एक आहेत असें समजतें.

पुण्यास एक शिल्प शाळा होणार व तिला ४००० रूपयांची लोकलफंडांतून व म्युनिसिप्यालिटीकडून मदत मिळणार आहे.

---

## शेतकरी लोकांचे स्थितीविषयीं द. बहिमनजी मा. सी. आय. ई. यांचा रिपोर्ट.

( मागील अंकावरून पुढें चालू )

६ माळी, बारी, व पाजणी हे लोक खेरीज करून हाल्लींच्या शेती करणारांची जातीनें श्रम करण्याची अनुत्सुकता आहे. सदरीं लिहिलेल्या जातीशिवाय निरनिराळे प्रकारचे शेती करणारे लोक आपले हातानें काम करणें ह्मणजे हलकेपणाचें कृत्य समजतात. आणि अगदीं दरीद्री अवस्थेंत येऊन पेंचिपर्यंत काम करण्यास मजूर लावितात. व ही काम करण्याची अनुत्सुकता कुटुंबांतील सर्व लोक वाटून घेतात. ज्या ठिकाणीं आयांनीं निंदण्यांत व पीक सावडण्यांत फार श्रम केले तेथें त्यांच्या लेकी फक्त घरकाम मात्र करितात.

७ वऱ्हाडी शेतकऱ्यांनां गरज नसलेल्या वस्तूंत त्यांचा उधळेपणा दृष्टीस पडतो. हल्लींचे शेतकरी आपले सवारीचे गाडी शिवाय किंवा घोड्याशिवाय किंवा ह्मशी शिवाय क्वचित राहतात. या गोष्टी निवळ ऐषआरामाच्या होत. व या नसल्या तरी चालेल. शेतीचे कोणतेही हेतूस या वस्तूंकडून मदत होत नाहीं. आणि यांत आरंभीं पैसे घालावे लागत असोन त्याबद्दल पुढेंही खर्च चालू असतो. तरी कर्जदारीपासून आणि दारिद्री अवस्थेपासून उत्पन्न होणाऱ्या अडचणीमुळें देखील त्या लोकांस या वस्तूंचा त्याग करवत नाहीं. त्यांपासून सोयतर थोडी आहे. परंतु येणेंकरून त्यांजला जो डौल मारतां येतो तोच त्यांचे मनाचा मोठा हेतु असतो. आणि हा डौल-बाळगण्यांत जो खर्च करावा लागतो तो त्यांचे कोत दृष्टीस बरोबर वाटतो. दुसरे कोणतेही लोकांपेक्षां ज्या लोकांचा कंजूषपणा अधिक असतो त्या लोकांस फक्त खेड्यापाड्यांत राहण्यास सुखकारक होण्यासाठीं अगदीं जरूरीच्या अशा गोष्टी करण्यांत उधळेपणा असणें हें बरोबर नाहीं. तत्रापि तो उधळेपणा वऱ्हाडींतील शेतकरी लोकांचे अति अविचारामुळें फारच वाढलेला आहे. जातीसंबंधी प्रत्येक कार्यांत ते आपल्यास अगदीं धुळीस मिळविण्यासारखे व ज्यांची अगदीं जरूरी आहे असें नाहीं असे खर्च अविचारानें करितात आणि लग्नाकार्यांचे संबंधानें तर ते फारच उधळेपणा करितात. पन्नास कोसांवरून पाहुणे बोलावितात त्यांच्या गाड्याच्या गाड्या भरून येतात, आणि त्यांच्या मुशाफरीचे सर्व खर्च हे देतात व दिवसांचे दिवस त्यांस व त्यांचे जनावरांस मोठे उत्तम रीतीनें पोसतात. यांच्या लग्नकार्यांतून नाच झालेच पाहिजेत अशी आलीकडे चाल पडलेली आहे. ते करण्यास त्यां पुष्कळ सामर्थ्य आहे ह्मणून करावयाचे असें नाहीं तर लौकिकसाठीं करावयाचे. शेजारच्या मुंबई इलाख्यांतील शेती करणारे लोक ज्या व्यवस्थेनें आपले घरचीं लग्न कार्यें करितात त्या व्यवस्थेशीं व इकडलिया लोकांच्या व्यवस्थेशीं मोठी तफावत दिसून येते. तिकडे देखील बराच उधळेपणा करण्याची चाल आहे परंतु त्या उधळेपणांत विचार व दूरदृष्टी असते. सातारा, नगर, पुणें या जिल्ह्यांत शेती करणारे लोक लग्नांत कांहीं देतात किंवा घेतात तेव्हां कार्याच्या खर्चाचा अर्धा भाग डागिणे वगैरेच्या देणगी रूपानें घेतात. डागिणे करून पैसा बाळगण्याची रीत हिंदू लोकांस मोठी प्रिय आहे. वऱ्हाडांत सर्व हेतु असा असतो कीं, बाहेरून येठे मातबर दिसावें. व तसें दिसण्या साठीं आपणांत सामर्थ्य नसलें तर कर्ज काढून कार्य करावें. विशेष जरूरीची नाहींत अशीं जातीसंबंधी कार्यें जीं दुसरे कोठें ठाऊक देखील नाहींत तीं वऱ्हाडचे लोकसंख्येंत फार वाढलेलीं आहेत व भरभराटींत येत आहेत. आणि हीं कार्यें अगदीं लहान कारणावरून देखील होतात- उदाहरण मुलीस ऋतु प्राप्त झाला ह्मणजे त्यासंबंधी आनंद प्रदर्शित करण्यास व जेवणावळी करण्यास हे लोक लग्नकार्याप्रमाणें अफाट खर्च करितात.

८ आपले शेजाऱ्यासी एखादी चुरस चालविणें किंवा जें आपल्यास मिळण्याजोगें आहे तें मिळण्याबद्दल ज्या हट्टानें वऱ्हाडी काम चालवितात तो हट्टही त्यांस दरिद्री करण्यास दुसरा एक मोठा जबर कारणरूप आहे. हे तंटे बहुत करून जमीनीचे मिरासदार व वतनदार यांचे दरम्यान असतात. व ह्या लोकांचा वर्ग फार मोठा असून ते पहिल्यानें आपले जमीनीचे मोठे शोकी असतात आणि वतन ही त्यांची दुयम प्राप्तीची आवड आहे. आपल्यास केलेले इजेचा सूड घेणें किंवा एकादा दावा शाबीद करणें किंवा आपल्या शत्रूचा पाडाव करणें यांत सर्व जिनगानीचा व्यर्थ खर्च होऊन दरिद्रावस्थेस बोलावून आपले घरीं आणतात. क्षमा करणें किंवा भुलणें हे तर वऱ्हाडी कधीं करीतच नाहींत आणि ते मिळण्यास अशक्य अशा वस्तु मिळण्याची आशा करून त्या प्राप्त होण्याची वाट पहात बसतात आपले हेतु साधण्यासाठीं अगर लढण्यासाठीं किंवा सूड घेण्यासाठीं आपले हल्लींचे स्थितीचा किंवा पुढल्या उमेदीचा तिलमात्र विचार न करितां ते आपले जवळ असतील ते उपाय करतात यामुळें पुढें लिहिलेल्या उदाहरणासारखीं उदाहरणें वारंवार घडून येतात. कोणा एका एक एकर जमीनविर दोघे भाऊ ती वडिलार्जित जमीन ह्मणून आपआपला हक्क आहे ह्मणून समजतात. त्या दोघांजवळही दुसरी पुष्कळ जमीन आहे. परंतु ह्या एका एकराबद्दलच त्यांचे डोक्यांत वेड शिरतें तेणेंकरून दावा व त्याचा उलट पक्ष उत्पन्न होतो आणि प्रत्येकजण नंदन लगू जाईल असें ह्मणून काम चालवितो. असें करून या हलक्या एक एकर जमीनीचे कबज्याबद्दल ते आपल्यास साधारण संपन्नतेपासून निवळ भीक मागण्याचे स्थितींत आणितात, याचप्रमाणें एखादे भांडणाचें मूळ पुष्कळ वेळीं अगदी क्षुल्लक व तुच्छ असतें. उदाहरणार्थ वऱ्हाडांत लग्नप्रसंगीं गावचे मुख्य मनुष्यास विशेष सन्मानार्थ विडा देऊन टिळा लावण्याची चाल आहे. हा पोकळ मान आपल्यास असावा असा दोघे भाऊ तंटा करितात आणि त्याबदल परस्पर दावे लढण्यांत आपले जवळ जें काय असतें तें व्यर्थ खर्च करितात. आपल्या मनांतील हेतु जो कोणत्याही गोष्टीनें मागें व्हावयाचा नाहीं त्याचा पाठलाग करण्यांत साधारण शेती करणारे अधिक. अशानें आपणास दरिद्री करून घेतात ह्याबद्दलचे तपशिलांत या ठिकाणी सिरलें तर कदाचित मनाचें रंजन होऊन त्यापासून कांहीं शिक्षणही मिळेल. एखादा दावा किंवा उलट पक्ष चालविण्याचें काम किंवा दुसरें एखादें कारण आपले मनांत काढून ते आपले कल्पनेप्रमाणें तडीस नेण्याचें मनांत आणून ते द्रव्यबळ जमा करितात.

एका मनुष्या जवळ १०२८९ सरकार साऱ्याची जामिन होती. आणि सन १८९३ चे मार्च महिन्यांत त्यास १०० रुपयांची तांबडतोबीची जरूरी लागली. अशा प्रसंगीं त्यानें सावकाराकडे जाऊन ९५ रुपये कर्ज घेतले आणि त्याबद्दल एक ५० रुपयांचा पुर्जा पुढले खरिपाचे हंगामाचा ह्मणजे त्याच सालचे नोवेंबर महिन्याचा दुहोऱ्याचे व्याजाचा लिहून दिला. आणि तो अशा शर्तीनें कीं सदर्हू करार टळला तर दरमहा दरशेकडा ३८१ प्रमाणें अधिक व्याज द्यावयाचें. बाकी राहिलेल्या ४५ रुपयांबद्दल त्यानें कायदेशीर व्यवस्था केली ती अशी कीं, सन १८९४ सालचे फेब्रुवारी महिन्यांत ५ मण गहू व एक खंडी हरभरे देण्याचें कबूल केलें. आणि तोही करार टळला तर दिढी देऊ किंवा एकंदर सर्वांचा कोणतेही एके पुढले मित्तीस जो बाजार भाव असेल त्याप्रमाणें दाम काढून देऊ असा करार केला. पुढें सदर्हू दोन्ही मर्यादा राहिल्या. कारण साधारण शेतीचे स्थितीची ज्यास माहिती आहे त्यास ही गोष्ट उघडपणें दिसून येईल कीं, ज्या पेक्षां खरिपाचें पीक डिसेंबरपूर्वी व रब्बीचे पीक फेब्रुवारी अखेर किंवा मार्चाचे आरंभीं निघत नाहीं, असें असून सदर्हू व्यवहारांत एके पक्षी सावकार आपल्यास चौपट मोबदला मिळण्यासाठीं व दुसरे पक्षी असामी आपली खैरोखर किंवा फक्त कल्पिलेली गरज पूर्ण करण्यासाठीं सदर्हू करार करून दिलेला व घेतलेला होता. पुढें पाहिला रूपये देण्याचा करार भरल्या तारखेस सावकारानें कुळावर फेड करण्याविषयीं तगादा केला. हा तगादा पुरा करण्यास असामीजवळ पैसा नव्हता. किंवा तितक्या किमतीचें पीक नव्हतें सबब त्यानें सावकारास मुळचे ५० रूपयांचे पुर्जाचे ऐवजीं दुसरा ६५ रुपयांचा पुर्जा देऊन त्यास स्वस्थ केलें. या पुर्जांत त्यानें अशी शर्त केली कीं, मार्च महिन्यांत ह्मणजे फेब्रुवारी महिन्यांत दर खंडीस ३२८८ रूपये प्रमाणें दोन खंडी कापूस देईन. हा पुर्जा करण्याचे वेळेस कापसाचा बाजार भाव ४० रूपये होता. व सदर्हू पुर्जांत आणखी पुढें असा करार होता कीं, सदर्हू करार टळला तर सदरी लिहिलेले दोन खंडी कापसाचा करार टळण्याचे वेळीं जो विक्रीचा भाव असेल त्या भावानें दाम काढून देईन. पुढें त्याचे बावराचे खरिपाचें पीक ज्यांतून त्याजला सदर्हू तगादे देण्याचे होते त्यांत दोन खंडी कापुस व सहा खंडी ज्वारी इतकें झालें. त्यापैकीं त्याचवेळेस देणें झालेला सरकारचे वायद्याचा पट्टीचा हप्ता ५१८४८६ वारण्यासाठीं त्यानें ३५ रूपये प्रमाणें कापूस विकून टाकिला व त्या पैकीं राहिलेले १९ रूपये घरीं खर्चासाठीं ठेविले. व ज्वारी पैकीं दोन खंडी बियासाठीं व बावरांतील मजुरीसाठीं साठवून ठेवून बाकी चार खंडी घर खर्चाकडे ठेविले. नंतर ६५ रूपयांच्या पुर्जाचा करार भरला व रिणकोजवळ करार केल्याप्रमाणें देण्यास कापुस नाहीं आणि सावकार तर आग्रहास पेटला. व असामीस त्याचे इच्छेप्रमाणें वागवेना ह्मणून सदर पुर्जांत करार टळल्यावर जी शर्त होती त्या शर्तीप्रमाणें वर्ता ह्मणून असामीनें सावकाराची प्रार्थना केली. व त्या शर्तीनें त्यानें दोन बोज्यांबद्दल १०० रूपये देणें कबूल केलें एथें ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं त्यावेळेस बोज्याचा भाव ४५ रूपये होता. पुढें रब्बीचें पीक देण्या विषयींचा दुसरा करार भरला परंतु पीक तयार नव्हतें सबब सदर्हू करार टाळल्यास जी शर्त होती त्या शर्तीप्रमाणें करण्याचें असामीस भाग पडलें. मग त्यानें दिढी सुद्धां सव्वा अकरा मण गहू व सव्वादोन खंडी हरभेर मार्च महिना अखेर देण्याचें कबूल केलें. या महिन्यांत रबीची सोंगणी झाल्यावर त्यांत १ खंडी गहू, १७ मण हरभरे व तीन मण तीळ असें पीक झालें. त्या पिकाची त्यानें पुढें लिहिलेप्रमाणे व्यवस्था केली.

गव्हांपैकीं १२ बारा मण गहू घर खर्चास ठेवून बाकी राहिलेले आठ मण ४० रूपयास विकले आणि त्यांत सरकार साऱ्याची राहिलेली त्या सालची बाकी ५१८४८६ दिली आणि १७ मण हरभरे असामींनें सावकारास देण्यास नेले. पण करार केलेला सव्वादोन खंडी माल पुरता नाहीं ह्मणून त्यानें ते सत्रा मण हरभरे घेण्याचें नाकबूल केलें. मग सावकारास खुश ठेवण्या साठीं असामीनें पुन्हा ३०० रूपये देण्याचें कबुल केलें त्याचा तपशील असाः— सव्वा दोन खंडी हरभऱ्याबद्दल रूपये २२५ आणि गव्हा बद्दल रूपये ७५ व या रकमेचे फेडींत सावकारानें परत केलेले हरभऱ्यांचे विक्रीचे दाम आलेले रूपये ८५ सावकारास देऊन बाकी राहिलेलें २१५ रूपयांबद्दल नवीन पुर्जा करून दिला. सदर्हू लिहिलेले व्यवहाराचा तपशील पाहतां हें उघड होतें कीं, असामीनें खरोखर मुद्दल ९५ रूपये उसणे घेतले होते व त्याबद्दल त्याजला अशा घोटाळ्यानें व गुप्त रीतीनें ४३० रूपये देण्याचें भाग पडलें. पैकीं फक्त ८५ रूपये मात्र त्याचे जमा आहेत. व ३४५ रूपये निवळ देणें राहिले. याप्रमाणें साल बसाल घडामोड होऊन कुणबी बिच्यारा सावकारास अगदीं विकला गेला. आतां हा व्यवहार एक कुणबी व चांगलें चालीचा मारवाडी यांचे दरम्यानचा झाला. परंत दुसरे गावानिहाय लहान लहान मारवाडी, रजपूत आणि इतर लोक कुणब्यासी व्यवहार करितात. त्यांची उदाहरणें आह्मी देऊ लागू तर सदरी लिहिलेले उदाहरणांत ज्या ठिकाणीं ४३० रूपये झाले आहेत त्या ठिकाणीं ६१५ रूपये होतील.

( पुढें चालू. )

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ३ अकोला रविवार ता० २० माहे जुलै सन १८७९ इसवी अंक २८

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |

डाक हाशील.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८३ |
| ,; दुसरे खेपेस | ८२ |

## वसूल.

| | |
|---|---|
| रा. रा. सखाराम विठ्ठल नाझर | ३८४ |
| ,, ,, रावजी घनःशाम वकील | २ |
| ,, ,, पुंजारामबाबा पाटील | २० |
| मे. आर्देसर दिनराजी तहाशिलदार | २४८४ |
| ,, कमिशनर साहेब उमरावती | ६८८ |
| रा. रा. भगाजी वलद चिधाजी | ६८८ |
| ,, ,, रामकृष्ण रावजी मास्तर पारस | ६८८ |
| ,, ,, रामचंद धोंडदेव स्टेशनमास्तर | १५ |
| ,, ,, श्रीधर नारायण मास्तर पुनवट | ९ |
| ,, ,, गंगाधर रावजी मास्तर रिसवड | ४ |
| ,, ,, कृष्णाजी दिनकर सुपरवाइझर | १० |
| ,, ,, आत्माराम गुणाजी गारपगारी | ६८८ |
| ,, ,, चिहू रामजी पाटील धामणगाव | ६८८ |
| मे. बिलंदखा हबीबखा मक्तेदार | ९ |
| रा. रा. अंताजी नारायण मास्तर | ३८४ |
| ,, ,, हणगोजी पाटील विंझेकर | ८ |
| ,, ,, धोंडबानाइक किडे | १८८१४ |
| ,, ,, सेक्रेटरी, नेटिव लायब्ररी मूर्तिजापुर | ३ |
| ,, ,, किसनलाल कन्हयालाल | ६८५८६ |
| ,, ,, सिद्धेश्वर कृष्ण वकील | २०८४८६ |
| ,, ,, हिंमत तुकाराम देशमुख कुरूम | २५ |
| ,, ,, बाळकृष्ण माधव पाटील जरूड | २७ |
| ,, ,, रा मरावे परशराम देशमुख | ७८७८९ |
| ,, ,, संपतराव देशमुख | ६८८ |

## विकावयाचीं पुस्तकें.

खालीं लिहिलेलीं पुस्तकें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. व तीं रोख पैशानें विकत मिळतील. बाहेर गावीं नेणारांस सुमार आठ आणे किंमतीचे आंतील पुस्तकांस एक आणा डाकहशील लागेल त्या सुमारानें पुढें एक रुपयास दोन आणे असें लागेल. व बरसातीचे दिवसांत मेणकापड लाविल्याशिवाय पोस्टांत बंगी घेत नाहींत. सबब आठ आण्याचे किमतीस सुमार एक आणा मेणकापडाबद्दल पाठवावा लागेल.

| कायद्या संबंधी | रु. |
|---|---|
| मुलकीखात्याचीं सर्क्युलर्रे | ४ |
| दिवाणी नवा कायदा | २८८ |
| क्रिमिनल प्रोसिजर | १८१२ |
| नादारीचे नियम ( वऱ्हाडाकरितां ) | ८८ |
| सेटलमेंट रूळ ,, | ८६ |
| दिवाणी सर्क्युलर्रे ,, | ८६ |
| पोलिसीची रूळ | ८३ |
| जाइंट रूळ | ८१ |

संस्कृत.

| | |
|---|---|
| अध्यात्म रामायण | ४ |
| प्रायश्चित्तेंदुशेखर | ८१२ |
| रजोदर्शनशांती | ८६ |
| धातुरूपावळी | ८३ |
| कोश-त्रिकांडशेष, मेदिनी, हारावली व एकाक्षरी ( आडगिराइकी ) | १ |
| भगवत्‌गीता | ८१ |
| गोत्रमालिका | ८४ |

प्राकृत

| | |
|---|---|
| सर्व संग्रह वामन पंडित भाग १ | ८१२ |
| ,, ,, ,, २ | ८१२ |
| मंत्ररामायण आर्या मोरोपंती | १८८ |
| विराटपर्वनाटक | ८१३ |
| वालीवध नाटक | ८१ |
| रुक्मिणीहरण नाटक | १८८ |
| हरिश्चंद्र नाटक | १८८ |
| भास्कर दामोदर कृत रत्नमाला ईश्वरस्तव | ८६ |
| सौभाग्यरत्न ( पुनर्विवाहसंबंधी ) | ८३ |
| विवेकसिंधू | ८१४ |
| काव्यमाधुर्य ( प्राकृत कवितांतील वेंचे ) | ८४ |
| शिवराजलीला ( केशवराव जेरेवेकर कृत कविता ) | ८१२ |
| गायनप्रकाश | ८४ |
| नलाख्यान आर्या मोरोपंती | ८३ |
| चतुःश्लोकी भागवत | ८६ |
| आरत्या | ८१ |
| हरिपाठ | ८१ |
| भूपाळ्या | ८१८६ |
| व्यंकटेशस्तोत्र | ८१ |
| चक्रव्यूह | ८२ |
| ध्रुवाख्यान | ८१ |
| धावे | ८१ |
| गणपतीचे श्लोक | ८८३ |
| रामनवमीव्रतमहात्म | ८१ |
| विष्णुसहस्रनामावली | ८२ |
| शिवसहस्रनामावली | ८२ |

मनोरंजक

| | |
|---|---|
| गोपीचंद नाटक हिंदुस्थानी | ८१२ |
| सिंव्हासनबत्तिशी ,, | ८१२ |
| फ्रेंच व जर्मन लढाइ | ८१४ |
| वसंतमाला ( कादंबरी ) | ८१२ |
| इंग्रजांची बखर | ८६ |
| काशीयात्रा | ८८ |
| काशीप्रकाश | १ |
| भ्रांतिकृतचमत्कार | ८६ |
| अनंतफंदीच्या लावण्या | ८८ |
| रामजोशाच्या लावण्या | ८८ |
| थोर पुरुषांचे व स्त्रियांचे पवाडे | १८८ |
| बापु गोखल्यांचें चरित्र | १ |
| व्यवहारोपयोगी तारतम्य | ८२८६ |
| हिंदुस्थानच्या दरिद्राचीं कारणें | ८२ |

वैद्यक

| | |
|---|---|
| वैद्यसुधाकर | १८४ |
| महामारी | ८६ |
| कुटुंबमंत्री | ८६ |
| गजकरणाचें औषध ( डबी ) | ८६ |

मुलांच्या उपयोगी.

| | |
|---|---|
| तिसऱ्या बुकाच्या दुसऱ्या भागाचें भाषांतर | १ |
| पहिले बुकाचें भाषांतर | ८२ |
| स्कूल डायलाग | ८२ |
| बालज्ञान | ८१ |
| अंकलिपी | ८१ |
| भूगोलविद्या | ८१८६ |
| बालव्याकरण | ८८९ |
| मोडी वाचन | ८३ |
| कित्ते मोडी मध्यम | ८८६ |
| मुलांकरितां पहिलें पुस्तक बाळबोध | ८१ |
| वाचन विद्या | ८१ |

## जाहिरात.

### सुबोधसार भाग पहिला.

राजनीति, व्यवहार वगैरेवर ग्रंथांतून अनेक विद्वानांच्या सहायानें नीतिपर, बोधक, मनोरंजक, आणि दृष्टांतीक असे सुभाषित श्लोक आह्मी निवडून त्यांचा सुबोधसार नावाचा ग्रंथ तयार केला आहे. यांत प्रथम श्लोक, त्याचे खालीं प्राकृत अर्थ, व त्याचे खालीं एकंदर श्लोकाचें व अर्थाचें खुलासेवार तात्पर्य लिहिलेलें आहे. हा ग्रंथ टाइपानें छापून लवकरच प्रसिद्ध होईल. याची किंमत अगाऊ आठ आणे व बुक बंगी व पोष्टाबद्दल एक आणा एकूण नऊ आणे ठेविली आहे. परंतु जितके वर्गणीदार दिळतील तितक्याच प्रति काढण्याचा इरादा आहे. जे लोक आह्मांस ओळखतात त्यांस पूर्वी आह्मी दुसरे ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत ह्याची खात्री असल्यानें अगाऊ वर्गणी देण्यास मागें पुढें पहाणार नाहींत; परंतु अपरिचित लोकांनींही अगाऊ वर्गणी देण्यास शंका घेऊ नये. कारण कांहीं ग्रंथकर्ते अगाऊ वसूल करून स्वस्थ बसतात परंतु तसा प्रकार एथें मुळींच नाहीं, असें आह्मी खात्रीपूर्वक कळवितों. वर्गणीदारांनीं आपलीं नावें व अगाऊ वर्गणी खालीं सही करणाराकडेस अथवा रा. रा. खंडेराव बाळाजी फडके वऱ्हाडसमाचार कर्ते यांजकडेस द्यावी. कळावें ता. ९ माहे जुलै सन १८७९ इ.

रंगनाथ सखाराम किकवीकर
स्टेशनमास्तर वरणगाव
जिल्हा खानदेश

## नोटिसा.

ती. रा. रा. राघो गोंविंद मुळे राहणार कसबे भिंगार तालुके अहमदनगर यास खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आह्मी खुद्द मिळविलेला मळा लाडुजी याचे मळ्याजवळचा, रावजी सिद्धेश्वर कुळकर्णी याजपासून खरेदी केला असून त्याची वहिवाट आज सतत आठ दहा वर्षे आह्मी खुद्द करीत आहोत, सदर्हू मळ्यावर वडिलांचा अगर भाऊबंदाचा कोणतेही प्रकारें हक्क नाहीं. असें असून तो तुह्मी दगलबाजीनें गहाण ठेवूं इच्छितां तर तुह्मीं असें करूं नये. आणि ही नोटिस पावल्यापासून पंधरा दिवसांचे आंत सदर्हू मळा तुह्माला करणें असल्यास तो तुह्मीं आमचे वतीनें करित अहात व आमचे मर्जीस येईल तेव्हां तो आह्मीं आपले कब्जांत घेऊं. अशा मजकुराचा दस्तऐवज लिहून आपले सहीनिशी आमचेकडे रजिष्टर करून पाठवावा. असें न झाल्यास मळा एकदम आह्मीं आपले ताब्यांत घेऊ. दगाबाजी नुकसान केलें असेल तर रीतिप्रमाणें तजवीज करूं. सदर्हू नोटिशींतील आशय जेऊर येथील कारभारी कुळकर्णी आणि पाटील यांस वक्तशीर कळावा. व कोणत्याही प्रकारची भानगड झाली असतां ते जबाबदार व्हावेत यास्तव या नोटिशीची नक्कल त्यांजकडे पाठविली आहे. कळावें तारीख १२ माहे जुलाई सन १८७९ इसवी.

मुक्काम वाघुळ पोस्ट देऊळगाव राजा मार्ग जालना.

( सही ) शंकर गोविंद मुळे दस्तुर खुद्द.

### नोटिस.

हेमला वल्लद हरचंद वखारे साळी पारोळकर हल्लीं मुक्काम येवलें जिल्हा नाशिक यांस— भिमी मर्द हेमला साळी मुक्काम वरणगाव जिल्हा खानदेश इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, मी तुमची लग्नाची बायको असून सुमारें दोन वर्षे झालीं दुष्काळांत माझे बापानें तुह्मी मेल्याची खबर मजला सांगून वरणगावीं एका गृहस्थाचे घरीं सोडून निघून गेला. मी अज्ञान असल्या कारणानें माझें पोषण आजपर्यंत ते करित आले. आतां मजला असें समजलें कीं, तुह्मी जिवंत आहात याजकरितां ही आनंदाची गोष्ट खरी असल्यास आपण समक्ष येऊन दोन वर्षांची खाउटी व लता कपड्याबद्दल मिळून रुपये १२० एकशे वीस ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत माझे पाळण करणारास देऊन मजला घेऊन जावें. मी येण्यास सिद्ध आहे. याप्रमाणें तुमचे कडून न झाल्यास माझे बापानें सांगितलेला आपल्या मरणाचा मजकूर खरा समजून जनरूढी प्रमाणें मी पाटाचा दुसरा नवरा करीन मग तुमचा माझेवर व माझे पाळण करणारावर कोणचेही प्रकारचा हक्क चालणार नाहीं. ही नोटिस मी आपले राजी खुषीनें लिहून दिली. तारीख १२ माहे जुलै सन १८७९ इ.

( सही ) भिमी मर्द हेमला वखारे साळी
निशाणी हातची बांगडी.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. महाराज मी फिरत फिरत कारंजास कांहीं कारणपरत्वें आलों व इकडे जें कांहीं नवल विशेष पहाण्यांत आलें तें सेवेसी सादर केलें आहे. सवडीनुरूप आपले पत्रीं छापाल अशी आशा आहे.

कारंजे हा गाव मूर्तिजापुराहून २० मैल दक्षिण आणि नैर्ऋत्य यांचे मध्य दिशेस आहे. दरम्यान चांगल्या प्रतीची सडक असून पूल मोऱ्या वगैरे जागोजाग बांधिल्या आहेत दर मैलावर एक एक दगड पुरून त्यावर इंग्रजींत " मूर्तिजापूर १ कारंजा १९ " अशीं अनुक्रमें चढते उतरते क्रमानें सुवाच्य अक्षरें खोदलीं आहेत. हा गाव पाहिला असत जिकडे तिकडे मोठमोठ्या भव्य इमारती दृष्टीस पडतात त्यांपैकीं कांहीं मोडकळीस आल्या असून कांहीं जशाच्या तशाच आहेत. यावरून हा गाव पूर्वीं मोठ्या सधन स्थितींत होता असें वाटतें. व हल्लींहि येथील सराफीची घडामोड व इतर व्यापाराची धांदल पाहिली असतां आपले वऱ्हाडांत याला तिसरा नंबर दिल्यास शोभल्यावाचून राहणार नाहीं. एथें मोठमोठे नामांकित सावकार धर्मात्मे होऊन गेले. जसे " लकुरसंगई " कीं ज्यानें उंटभर कस्तुरी चिखलांत टाकून भिंतीला गिलावा केला तिची किंमत एका शिक्क्यांचे रुपयांनीं भरून दिली. काशीयात्रेस जात असतां कोणी एक मनुष्य आपले पूर्वजांनीं बांधलेल्या विहिरीवर बसून दर मनुष्यापासून पाणी पिण्याबद्दल एक पैसा घेत असे. तें पाहून सर्व यात्रेकऱ्यांस पाणी पिण्यास सुलभ व्हावें ह्मणून त्याविहिरीस लागलेला सर्व पैसा त्या वारसास यानें रोख दिला. व यात्रेकऱ्यांज वळून वचन घेऊन आपला निर्वंश व्हावा ह्मणून भागीरथींत उदक सोडविलें कशा साठीं! मी केलेल्या धर्मकृत्याचे आड असाच कोणी माझा वंशस्थ येईल ह्मणून. अहाहा ! कायही धर्मबुद्धी? दुसरा सावकार "काळे" कीं ज्यानें खानदेशापासून काशीपर्यंत साधारण गावीं सुद्धां आपलें दुकान स्थापन करून मोठ्या टोलेजंग-इमारती उभारल्या आहेत त्या काळ्याचा मूळ पुरुष एथीलें राहणार असून अगदी कंगाल स्थितींतून नावारूपास आलें असें ह्मणतात.

हल्लीं एथें तुकाराम नाईक काण्व या नावाचे सावकार आहेत हेही चांगलें सधन असून धर्मपरायण आहेत. यांची एथें पांच सात चांगलीं दुकानें असून मुंबई, मूर्तिजापुर व उमरावती एथेंही मोठीं दुकानें आहेत. यांणीं एथें एक रामर्मंदिर ३०।४० हजार रुपये खर्च करून फार चांगलें बांधलें आहे. हें देऊळ वाशिमच्या बालाजीच्या देवळाप्रमाणें असून त्याहून थोडें लहान आहे. दगडी काम व सभामंडप फार सुरेख केला आहे.

मूर्तीचे अंगावर डावडागिने हजारो रुपये किंमतीचे असून देवालयाचे सुव्यवस्थेकरितां तकाराम नाईक काण्व यांणीं ५०००० पन्नास हजार रुपये निराळे भांडवल देऊन निराळें दुकान स्थापन केलें आहे. व त्याचें व्याजावर व्यवस्था चालते. या शिवाय तुकाराम नायकाचें धर्मकृत्य व अन्नदान नेहेमी चालूच असतें. गेल्याचे मागील वर्षीं यांणीं चाळीस हजार रुपये खर्च करून मोठा यज्ञ केला. व हल्लींहि त्यांणीं सवालक्ष ब्राह्मण भोजनाचा संकल्प सोडून प्रत्यही ब्राह्मणभोजन सुरू केलें आहे. व गावांतील सर्व गृहस्थ व भिक्षुक यांचे घरीं एकदम तीन महिन्यांचें आमंत्रण देऊन ठेवलें आहे व याशिवाय इतर जातीचे लोकांसहि एक एक दिवस आमंत्रण जात असतें. याप्रमाणें नेहेमी क्रम सुरूं असून १० वाजतां पंक्ती सुरूं होतात. या अशा महर्गतेचे दिवसांत हजारो मनुष्यांचें अन्नें संतर्पण तीन तीन महिने पर्यंत चालविणें ह्मणजे सामान्य गोष्ट नव्हे यावरून तुकाराम नाईक काण्व यांची मोठी औदार्यबुद्धि असें ह्मटल्यावाचून रहावत नाहीं पण अशा प्रकारच्या धर्मकृत्यापासून देशाचे उत्कर्षास कितपत साधन होईल तें न जाणो!

एथें इंग्लिश मराठी शाळा, पोस्ट आफिस, दवाखाना, व दोन चीफ कान्स्टेबल आहेत. पूर्वीं एथें बरेच दिवस तहशील कचेरी ही होती व मुनसफ कचेरीही होती. परंतु हल्लीं सदर्हू कचेरीचीं आफिसें उद्वस्त पडल्या सारखीं दिसलीं. तहशील कचेरी तर बरेच दिवस एथें नाहीं परंतु मुनसफ कोर्ट तर या वर्षांत मूर्तिजापुरास गेलें तें तेथेंच स्थाईक झाल्या सारखें झालें आहे व तेणेंकरून कारंजें हें खेड्यापेक्षां खेडें दिसूं लागलें आहे. आतां पत्रविस्तारभयास्तव पुरें करितों. पुन्हा भेटेन- तारीख ५ जुलाई सन १८७९

तुमचा दास रामात्मज.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

मूर्तिजापुराहून—विनंती विशेष महाराज मे० महमद मुबारक अलीसाहेब तहशिल्दार यांची येथून बदली झाली व नुकतेच ते आपले नवे जागीं जाण्याकरितां एथून गेले त्या दिवशीं येथील ग्रामस्थांची मोठी सभा भरली होती व त्यांनीं तहशिलदार यांच्या जाण्यापासून आपलें दुःख प्रदर्शित केलें. त्या वेळीं त्यांचें वर्णनपर एक लहानसा निबंध वाचला तो आपणाकडे पाठविला आहे कृपा करून प्रसिद्ध केला असतां सर्वांस श्रुत होईल.

"आह्मी या शहरांतील व तालुक्यांतील आज एथें जमलेले रहिवासी आपल्या स्थलांतराच्या संबंधानें या जाण्याच्या प्रसंगीं प्रेमयुक्त अंतःकरणानें आपणास भेटण्याकरितां आपणापाशीं आलों आहो.

आपण एथून बदलून जात आहा ह्मणून या प्रसंगीं आपल्याविषयींचे आमचे मनांतील असलेलें प्रेम शद्बद्वारा प्रसिद्ध व्हावें हें स्वाभाविकच आहे.

आपल्या सुसमागमाचा वियोग होण्याचा आज प्रसंग आला ह्मणून आह्मांस फार दिलगिरी वाटते, कारण आपला जो सुमारें साडे सहा वर्षें आह्मास समागम झाला तो फार सुखप्रद होऊन कल्याणकारक झाला. इतक्या काळांत आपण उत्तम रीतीनें आह्मास वागविलें त्याची आठवण आमचे मनांत इतकी दृढ झाली आहे कीं ती आह्मी कधीं विसरणार नाहीं.

आपल्या अंगीं परमेश्वरानें काम करण्याचे अद्भुत गुण ठेविले आहेत त्यांची तारिफ आमच्या अल्पबुद्धीनें करणें फार कठीण आहे परंतु जे विद्वान आणि जे सरदार आपल्यावर अधिकारी येत गेले त्यांनीं त्यांनीं आपल्याविषयीं वार्षिक रिपोर्टांत जे मनोभाव प्रगट करून ठेविले आहेत त्यावरून स्पष्ट दिसतें कीं आपण मोठे हुशार व चलाख असून रयतेला कसें वागविलें पाहिजे हें आपणास चांगलें माहीत आहे व आपली कामकरण्याची शैली फार उत्तम आहे.

आपण आमचेवर अधिकारी आल्यापासून आपल्या हातून सार्वजनिक कामेंही बरींच झालीं त्यांत एक काम तर असें झालें आहे कीं तसें आपल्या बरोबरीचे वऱ्हाडांत जे अधिकारी आहेत त्यांतून थोड्यांच्या हातूनच झालें असेल असें वाटतें. तें कोणतें ह्मणाल तर आमच्या शहरची सुधारणा व स्टेशनावरील वसाहत. स्टेशनावर पूर्वीं बिलकूल वस्ती नव्हती त्या ठिकाणीं आपण श्रम करून लोकांकडून हजारो रुपये खर्च करवून दुकानें व घरें बांधवून पुष्कळ वस्ती केली आणि त्या ठिकाणीं कपाशीच्या व्यापारास उत्तेजन येण्याकरितां गठ्ठे दाबण्याचे यंत्राचे कारखानेही दोन आणविले यामुळें आमचे शहरांत पुष्कळ व्यापारी येऊन राहिले त्या योगानें व्यापार वाढला आहे. आपण येण्या पूर्वीं जी एथें वस्ती होती तिच्या तिपटीवर हल्लीं झाली आहे तिची वृद्धी होण्याचें मूळ बीज पाहिले असतां आपणच आहा. तसेंच गावांतील सडका करविणें, घरें ओळीनें बांधविणें, दवाखाना आणविणें, व लायब्ररीची स्थापना करणें हीं सर्व कामें आपले हातून आमचे सुखाकरितां व कल्याणाकरितां झालीं आहेत याबद्दल आह्मी आपले जितके आभार मानू तितके थोडेच आहेत.

गुदस्त सालीं व पैवस्ता या शहरांतील व तालुक्यांतील संभावित व लायक अशा कितिएक गृहस्थांस आपण जनाब कमिशनर साहेब बहादूर यांजकडून खुर्च्यांच्या मानाचे दाखले आणि लायकीचीं सर्टिफिकिटें देवविलीं आहेत हें आह्मा लोकांवर मोठे उपकार आहेत व ही देणगी आपल्या स्मरणाची मिळाली असें आह्मी समजतों.

आपण आह्मावर जे वर लिहिलेले उपकार केले त्याबद्दल आह्मी आपले फार आभार मानून जगनियंता जो परमेश्वर त्यापाशीं अशी प्रार्थना करतों कीं आपलें कल्याण उत्तरोत्तर अधिक व्हावें. आपली कीर्ति नेहेमी रहावी व आपण चिरायु व्हावें. ,,

याप्रमाणें निबंध वाचिल्यावर त्यांनीं थोडक्यांत समर्पक भाषण केलें व पान सुपारी वगैरे होऊन सभा बरखास्त झाली. कळावें ही विनंती.

एक सभेस जाणारा.

---

**वऱ्हाडसमाचार**

मिति श्रावण शुध्द १ शके १८०१

---

## दक्षिणेंतील घुशी.

हें प्रकरण बरेंच माजलें आहे. दक्षिणेंत दोन तीन वर्षांचा दुष्काळ अनावृष्टीनें आहे व गेल्या सालीं चांगली वृष्टी झाली तर घुशींनीं पीक खाऊन फडशा केलें. व तेणेंकरून लोकांचें फार नुकसान झालें आणि आतांही या वेळीं आरंभीं पेरणीच्याच हंगामास पुन्हा घुशी शेतांतून पुष्कळ झाल्या व त्या खराबा करूं लागल्या. त्यांचा बोभाटा इलाख्याच्या सरकारापर्यंत गेला तेव्हां त्यांनीं या कामीं विशेष मन घातलें. व दोन तीन मनुष्यांचें एक कमिशन या कामीं काय तजवीज करावी तें ठरविण्याकरितां नेमिलें होतें. आणि त्यांच्या अभिप्रायावरून मुंबई सरकारानें तारीख १२ जुलै रोजीं ठराव केला आहे तो आमचे पहाण्यांत आला त्यांतील तात्पर्यः-

गुदस्त सालीं घुशींनीं ज्या जिल्ह्यांतून फार नासाडी केली त्याच जिल्ह्यांत या सालीं आरंभापासूनच घुशी पुन्हा उठून त्यांनीं नाश मांडिला आहे हें ऐकून सरकारास फार वाईट वाटतें. चांगला मोठा सपाट्याचा पाऊस पडला ह्मणजे या सर्व घुशी मरण पावतील. व ईश्वरकृपेनें लवकरच चांगला मोठा पाऊस पडेल अशी सरकारास उमेद आहे. तरी तोंपर्यंत घुशींकडून अधिक नुकसान होऊं नये. व प्रतिआठवड्यास अधिकाधिक घुशी वाढल्याचे रिपोर्ट येत आहेत सबब त्यांचा बंदोबस्त व्हावा ह्मणून सरकार तावडतोबीनें तजवीज करीत आहे कीं, नेटिव लोकांकडून ठिकठिकाणीं या घुशी टार माराव्या. व तशा त्या मारणारास सरकारांतून प्रति १०० घुशींस एक रुपयाप्रमाणें बक्षिस द्यावें. आणि हा ठराव एक महिनापर्यंत चालू ठेवण्याचा सरकारचा निश्चय आहे. तोंपर्यंत बहुतेक घुशी नाहींशा होतील व चांगला पाऊसही पडेल डाक्टरच्या अभिप्रायाप्रमाणें त्यांवर विषप्रयोगाचाही उपाय करण्याविषयीं जिल्ह्याजिल्ह्याचे कलेक्टरांस सरकारानें लिहून कळविलें आहे. सरकारची अशी इच्छा आहे कीं सर्व ठिकाणच्या सर्व नेटिव लोकांनीं या कामीं मनापासून झटून या प्रजापीडक प्राण्यांचा नाश करण्यांत सरकारास सहाय करावें.

सरकारानें या वेळीं ही गोष्ट लवकर मनावर घेतली हें फार चांगलें झालें. बक्षिसाची रकम कमी आहे असें आह्मांस वाटतें. तरी गोरगरीब, अनाथ, व अन्नार्थी असे बहुत मजूर लोक आहेत त्यांस महिनाभर हा रोजगार होईल व ते झटतील तर त्यांस बरीच कमाई होईल असें आह्मांस वाटतें. या बाबदींत गेल्या आठवड्याच्या कित्येक वर्तमान पत्रांतून सरकारचा ठराव ह्मणून एक मजकूर प्रसिद्ध झाला आहे परंतु कोणी इंग्लिश पत्र कर्त्यानें ती थट्टा केली आहे तें न समजून वास्तवीक प्रकारासारखाच तो ठराव बहुतांनीं लिहिला आहे हें पाहून आह्मांस आश्चर्य वाटतें. घुशी मारण्याकरितां विलायतेहून दोन दोनशें रुपये पगाराचे ५०।६० आफिसर शिकारी कुत्र्यानिशीं यावयाचे आहेत. ते अविवाहीत असावे, त्यांस मुली नसाव्या, त्यांनीं गाणीं गाऊं नयेत वगैरे नियम सरकारानें त्याविशीं केले आहेत असें त्यांत आहे. पण याजबद्दल कोणास कांहीं

शंका आली नाहीं, ही अजब गोष्ट आहे. अस्तु. सरकारचा आरंभी आह्मीं लिहिलेला प्रयत्न सफल होवो व मोठा पाऊस पडून सर्व घुर्शीचा निःपात होवो असें आह्मी मनापासून इच्छितों.

## नेटिव लोकांची राजनिष्ठा.

या विषयाची अलिकडे बरीच वाटाघाट चालली आहे. इंग्लिश लोकांच्या आज सुमार ६० वर्षांच्या राज्यरीतीच्या अनुभवावरून, त्यांच्या पराक्रमाच्या अनुभवावरून, व त्यांजपासून पूर्वीपेक्षां आमचे देशास जे सुखाचे अधिक लाभ होत आहेत त्यांवरून प्रजासमूह त्यांविषयीं अनिष्ट मत धारण करील इतका आमचा हिंदुस्थान देश कृतघ्न नाहीं. व त्यांच्या राज्यावर जी आमची भक्ती आहे तिचे उद्गार अनेक प्रसंगीं अनेक नेटिव व युरोपियन गृहस्थांकडूनही वदले जात असतां कोणी नेटिवांविषयीं दुष्टबुद्धीचे व कुरापतखोर लोक व वर्तमानपत्रें नेटिवास ते राजनिष्ठ नसल्याविषयीं दोष लावितात हें पाहून आह्मास फार वाईट वाटतें; पण त्यास उपाय काय! बोलणाराचें तोंड दाबवत नाहीं व लिहिणाराचे हात बांधवत नाहींत! आणि ते आपला मनाचा दुष्टपणा हरप्रसंगीं बाहेर काढतात.

रामोशाचे दंगवडे पडूं लागले त्यांस ब्राह्मण लोकांचें अंग आहे व ते राजकीय उलाढालीचे प्रदर्शक आहेत असें ते ह्मणू लागले. पुण्यांतील वाडे जळाले त्यालाही ते आमच्या प्रजेचा असंतुष्टपणा व द्रोह हीं कारणें लावूं लागले. सार्वजनिक सभा बदमाश सभेसारखी आहे असें त्यांचे मत आहे. पुण्याचे टौनहालांत विद्वान लोक जमून फितुरी मसलती होतात असें ते वेलाशक ह्मणतात त्यांस काय ह्मणावयाचे आहे? ते विद्वान व योग्य आहेत इतकेंच ह्मणणें पुरें. संतोषाची गोष्ट आहे कीं सर्वच तसे नाहींत. मुंबईचे टाइम्स पत्रकर्ते आपले लेख फार पोक्तपणें लिहितात, व नेटिवांवर अयोग्य प्रकारचा हल्ला कधीं करीत नसून हल्ला करणाऱ्या दुर्व्रात्य गृहस्थांस वेळोवेळी ते योग्य जबाब देतात! ही मोठी संतोषाची गोष्ट आहे. तसेंच सरकारचे अधिकारीही उत्तम अनुभवीक व आमचे लोकांस चांगले जाणणारे आहेत ही त्याहून उत्कृष्ट गोष्ट आहे. अशांच्या योगानें आमचा बोजआहे व आह्मी अजून तगलों आहो. नाहींपेक्षां मागेंच आमची धूळधाण झाली असती. असो. मुंबईचे गवरनर साहेबांस गेल्या आठवड्यांत पुण्याच्या सार्वजनिक सभेनें एक मानपत्र देऊन आपले विचार कळविले त्याचें फार समर्पक उत्तर सर रिचर्ड टेंपल साहेबांनीं दिलें आहे. व त्यांत नेटिवांच्या योग्यतेचा व राजनिष्ठेचा उलगडा केला आहे ह्मणून त्याचें तात्पर्य एथें आह्मी आपले वाचकांचे संतोषार्थ देतों.

गवर्नर साहेब ह्मणाले, सरकार वरिष्ठ प्रकारची विद्यावृद्धी करण्यास झटत आहे त्याचा असा हेतु आहे कीं, नेटिव लोक आणि इंग्रज सरकार यांचा निकट व सप्रेम संबंध जडावा— पूर्वभागांतील दुष्काळामुळें आह्मांस वाईट वाटत आहे. पण तत्संबंधी दुःखें लवकरच नाहींशीं होतील अशी आह्मांस आशा आहे. हल्लीं दुष्काळ पिंडीतांस साहाय मिळत आहे व त्या व्यवस्थेपासून देशाचें स्थिर कल्याण होणार आहे— सरकारीचे प्रयत्नानें दरोडे लवकरच संपले याजबद्दल सरकारकारची तारीफ झाली ती योग्य आहे. त्या कामांत शेतकरी लोकांचा अगदीं संबंध नव्हता ह्मणून सरकारास बिलकुल प्रयास पडले नाहींत— शेतकरी लोकांच्या सुधारणेसाठीं कायदा होत आहे. देशांत जंगलें अधिक राखिलीं जात आहेत यांपासून रयतेचें फार हित आहे— लोकांत राजभक्ति चांगली आहे ही गोष्ट आह्मी कबूल करितों. दक्षिणेंतील सर्व प्रजेवर आमचा भरवसा आहे तरी आह्मीं असें ह्मणूं शकत नाहीं की, एकूण एक मनुष्य एकसारख्याच विचाराचे असतील, राजकीय विषयासंबंधी ज्यांचे विचार चुकीचे असतील त्यांनीं चांगलें मनन करून ते बदलावे. तरी आह्मी खात्रीपूर्वक सांगतों की, राजद्रोह आणि असंतुष्टता या गोष्टी आह्मी एक समजत नाहीं. राज्यव्यवस्थेंतील कमताईचे योगानें अथवा एकादे विशेष गोष्टीचे संबंधानें रयतेनें असंतुष्ट होणें वावगें नाहीं व तशाचा निःपक्षपातानें व निरभिमामानें विचार करण्यास आह्मी सर्वकाल तयार आहो. आणखी आह्मी अखेरीस असें सांगतों कीं, एकंदर प्रजेपैकीं फार मोठ्या समुदायाच्या राजनिष्ठेवर व सुविचारावर आणि विशेषें वरिष्ठ प्रकारच्या प्रजेच्या राजनिष्ठेवर आणि साद्विचारावर आमचा पूर्ण भरवसा आहे आणि तो तसा ठेवणें आह्मी हक्क समजतों.

हे गवर्नर साहेबाचे विचार किती मोलवान आहेत? व कसे अक्षरशः खरे आहेत! आमच्या टाइम्स कर्त्यानें लिहिलें आहे कीं, अलीकडील विद्वान लोकांची राजनिष्ठा फार उत्तम आहे. तो ह्मणतो कीं, ज्या सार्वजनिक सभेस श्री० पंत प्रतिनिधी अध्यक्ष आहेत, जिला सांगलीकर, जमखंडीकर, विंचुरकर, अक्कलकोटकर, जतकर, फलटणकर, व कुरुंदवाडकर हे उपाध्यक्ष आहेत, ज्या सभेला सरकार नोकरी उत्तम तऱ्हेनें करून प्रसिद्धीस आलेले पेनशनर कामदार व नामांकित वकील, सावकार, इनामदार इत्यादि व्यवस्थापक आहेत, ती सभा बदमाष किंवा फितुराचे विच्यार करणारी आहे असें ह्मणणारे जात्याच कोणते प्रकारचे असावेत हें सर्वांस उघड समजत आहे.

काबुलाकडील वर्तमान— तारीख १६ ची सिमल्याची तार प्रसिद्ध झाली आहे. तींत कंदाहाराहून तारीख १५ पर्यंतच्या आलेल्या बातम्या लिहिल्या आहेत त्या येणें प्रमाणें:— कंदाहारांत व आसपास सर्व स्वस्थता आहे. सरकार साऱ्याचा वसूल धान्यानें व पैशानें जमा होत आहे. हिरात येथून ८० मुशाफर आले ते तेथें व वाटेनें आलेल्या भागांत सर्व स्वस्थता आहे असें सांगतात. ग्यारिसनच्या ६ पलटणींला काबुलास जाण्याचा हुकूम झाला आहे. तहनाम्याची जेथें जेथें बातमी गेली तेथें तेथें लोकांस संतोष झाला आहे. कंदाहारांत महामारीचा उपद्रव जरा वाढला आहे. दररोज सुमार ५।६ मनुष्यें लागतात. पण भोवतालच्या खेड्यांतून याची संख्या अधिक आहे. १०।११ तारखेपर्यंत फौजेंत कांहीं विशेष आजार नव्हता. ३ युरोपियन मेले होते. पण पुढें एक दिवस जाऊन फार गर्दी झाली. ३६ अवरांत ५० मनुष्यें लागलीं. त्यांत गुरखा पलटणीतील १० होती. ती पलटण व १९ वी पलटण छावणींत नेली. दुसरें दिवशीं उपद्रव कांहीं कमी होता. बलुची पलटणींतील ३ मनुष्यानीं आपले एका सोबत्यास मारिलें ह्मणून त्या तिघांनां फाशीं दिलें. पुंडे जातीचे कारवान लोक हिंदुस्थानांतून व्यापाराकरितां येऊं लागले आहेत. हवा थंड आहे. शियरअलीखान नवीन गवरनर थोडे दिवसांत कंदाहारास दाखल होतील.

पुण्याचे रा. रा. केरो लक्ष्मण छत्रे यांची माहिती बहुतेक साऱ्या महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या देशांस असेल यांत संशय नाहीं, त्यांच्यासारखे सुस्वभावी, बुद्धिवान, गणितशास्त्रवेत्ते, व शास्त्रीय विषय जाणणारे थोडेच लोक असतील. त्यांनीं विद्या खात्यांत व पूर्वी वेधशाळेकडे मिळून सरकारची चाकरी ३० वर्षे केली. हल्लीं ते पुण्यास डेकन कालेजांत कायमचे गणिताचे प्रोफेसर असून अक्टिंग प्रिन्सिपाल होते व त्यांनां एक हजार रुपये पगार मिळत होता. त्यानीं वृद्धापकाळामुळें पेनशन मिळण्याचा अर्ज केला ब तो सरकारानें मंजूर केला. आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं, मुंबईचे गवरमर सर रिचर्ड टेंपल साहेब यांनीं त्यांच्या पेनशनाच्या ठरावाच्या वेळीं फार उत्तम लेख लिहिला आहे व त्यांत त्यांच्या नेकीच्या नोकरीविषयीं, हुशारीविषयीं, व चांगुलपणाविषयीं तारीफ केली आहे. व असे सद्गृहस्थ सरकार नोकरी सोडून घरीं बसले याजबद्दल खेद प्रदर्शित केला आहे. ही केरोपंतास मोठी भूषणाची व त्यांसारख्या मोठ्या प्रतीच्या दुसऱ्या कामदारास उमेदीची गोष्ट आहे. केरोपंतास दोन मुलगे चांगले हुशार असून बरेच नामांकित आहेत.

## वऱ्हाड.

अडगावचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनरचें कोर्ट तेल्हाऱ्यास जाण्याविषयीं वाटाघाट चालली होतीं परंतु प्रस्तुत त्याविषयीं कांहीं विचार होऊ नये असें ठरून तें प्रकरण मागें पडलें असें समजतें.

उमरावतीचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. बाळकृष्ण शास्त्री बापट ४ दिवसांची रजा घेऊन गेले रविवारीं एथें मित्रमंडळीस भेटण्यास आले होते ते शुक्रवारीं परत गेले.

मि. एटकीन साहेब विद्याखात्याचे आफिशियेटिंग डायरेक्टर शाळा पहाण्याकरितां वाशीमास गेले होते.

एथील मुलींच्या शाळेस म्युनिसिप्यालिटीकडून दरमहा १२॥ रुपयांची मदत मिळाली आहे परंतु ती द्यावी किंवा नाहीं याविषयीं पुन्हा वाटाघाट होऊन सोळावे तारखेस ठराव झाला कीं बजेटांत मंजूर होऊन आल्याप्रमाणें ते रुपये मुलींच्या शाळेस मिळत जावे.

म्युनिसिप्यालिटीकडे इंग्लिश पत्रव्यवहार व इंजनेरी काम याची वारंवार नड पडते सबब २५ रुपये दरमहा अलावन्स देऊन रा. रा. सदाशिव विष्णु भागवत यांस आनररी सेक्रेटरीच्या कामावर नेमावें असा ठराव झाला. व ही नेमणूक योग्य झाली याजबद्दल आह्मांस संतोष वाटतो.

अकोल्याच्या व्यापारी लोकांकडून राकआयल तेलाचे डबे आगीच्या भीतीस्तव गावाबाहेर ठेववावे असा कमिटीचा विचार होता; पण या आठवड्यांत भरलेल्या कमिटींत त्याची वाटाघाट होऊन तसें न करण्याचें ठरलें. हें एक प्रकारें बरें झालें. नाहींपेक्षां व्यापारी लोकांस अडचण होऊन त्या व्यापारास मंदी येऊन गोगरीबांस जें तेल स्वस्त मिळत आहे तें महाग झालें असतें. व्यापाऱ्यांनीं व या तेलाचा उपयोग करणारांनीं त्या कामीं चांगली सावधगिरी ठेवावी इतक्यापुर्ता बंदोबस्त जागच्याजागीं असणें बस आहे.

रा. रा. सखाराम दत्तात्रय बाळापुरचे तहाशिलहार यांस उद्यापासून पेनशन मिळण्याचा ठराव झाला. त्यांचा निमें पेनशन मिळण्याचा अवधि पुरा होण्यास सारी आठ महिन्यांची नोकरी होणें शिलक होती असें असतां मागेंच त्यांस तिजाई पेनशनावर काढिलें होतें पण हल्लीचे आमचे पोक्त विच्यारी मे० जोन्स साहेब कमिशनर यांस त्यांची दया येऊन त्यांनीं यांस पुन्हा तहशिलदारीवर नेमून निमे पेनशनाची मुदत पुरती करून घेतली याबद्दल आह्मी त्यांची स्तुति करितो. सखाराम बाबा हे गृहस्थ साळसूद, पोक्त, हुशार व चालीरीतीचे आहेत. त्यांचे जागेवर मि० सफदर अली पोलिस इन्स्पेक्टर यांस नेमिलें.

पर्जन्याविषयीं हाकाहाक झाली होती पण काल आणि परवा मध्यम पाऊस पडून बरीच आशा आली.

मि० फिट्जपात्रिक साहेब यांस वऱ्हाडांत एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर नेमिलें.

अकोटास पिवळे रंगाचा पाऊस पडला असें समजतें.

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार इजुकेशनल इन्स्पेक्टर व रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान डिपुटी इन्स्पेक्टर शाळा पहाण्याकरितां बाहेर गावीं गेले आहेत.

## वर्तमानसार.

मि० नरसी केशवजी यांजवर एका कंपनीचा ब्यालन्सशीट रेजिस्ट्रारकडे दिला नाहीं असा एक च्यार्ज्य आला होता व त्याबद्दल त्यांनां १०० रुपये दंड झाला. केस बडीजी यांजवर चालू आहे तिची थोडी चौकशी होऊन कांहीं साक्षीदार झाले व उद्यावर मुकद्दमा तकूब आहे.

रजपुताना स्टेट रेलवे बिवारपासून रायपुर पर्यंत चालू होणार. या भागांत अरावली डोंगर व मारवाडचें मैदान आहे.

सन १८८१ सालांत जगांत मोठा प्रळय होणार आहे असा एका मोठ्या जुनाट

मनोऱ्यावर लेख लिहिलेला सांपडला असून त्याचें भाषांतर एका युरोपियन विद्वानानें करून प्रसिद्धीस आणल्याचें कळतें.

---

## शेतकरी लोकांचे स्थितीविषयीं द. बहिमनजी मा. सी. आय. ई. यांचा रिपोर्ट.

(मागील अंकावरून पुढें चालू)

नुकताच एक मुकदमा आमचे समोर आला होता त्यांत फक्त १५० रुपये उसने घेतलेले होते आणि त्याचे फेडींत प्रतिवादीनें रुपये १५० व अधिक रुपये दिले होते तरी त्याजवर १६० रुपये बाकी निघून त्याबद्दल फिर्याद झाली होती. अशा प्रकारचे पुष्कळ मुकदमे आमचे समोर येतात. आतां या ठिकाणीं आह्मांस एका प्रसिद्ध नागपुरचे सावकाराबद्दल लिहिणें आहे, त्यांचे नाव बुटी. हा सावकार १०० रुपयाचे पुर्ज्यांत फक्त ६७८८ रुपये ऋणकोस देतो.

मुदल रुपये ८० यांजवर लाविलेली रास ई रुपये २५ याचा महिना ४ रुपये प्रमाणें देणें. त्यांत पहिला महिना व जसवत बालाजी मिळून ३२८८ कापले जातात आणि सुमार दोन वर्षांत या मूळ उसनवार दिलेल्या ६७८८ रुपयांचे एकशे सव्वीस रुपये होतात. आणि सदरी लिहिलेल्या मुळचा असामी मयत होतो तेव्हां सावकारास पूर्णपणें ठाऊक असतें कीं, सन १८६७ चा आक्ट नंबर २७ प्रमाणें मयताचें कर्ज त्याचे जिनगी पुरतेंच लागूं असतें व फिर्याद केल्यास आपली नुकसानी होइल सबब तो कोर्टांत जाणें टाळतो. आणि मयताचे चार मुलगे व विधवा यांजला वचने देऊन व त्यांजपासून मयताकडे असलेले बाकीबद्दल त्यांचे नांवें नवा पुर्जा करून देण्यासाठीं त्यांचें मन वळवूनें त्यांस आपले ताबडींत घेतो. व आपला हेतु तडीस नेण्यासाठीं त्यांजला पांच पंचवीस रुपये उसने देऊन असें दाखवितो कीं, आपण मोठे दयाळु आहो. शिवाय सदरील बाकींतून ५० रुपये सूटही देतो. याप्रमाणें त्या मुलांस व त्या विधवेस असें वाटवितो कीं हा सावकार मोठा दयाळु आहे सबब आपण यास छकूं नये. याप्रमाणें ते मुलगे, आणि ती विधवा आपलेवर मयताचें कर्ज लादून घेतात. मग सावकारानें मयतास जसें लुटलें त्या प्रमाणेंच या हतभाग्यांस लुटण्याचें तो सुरू करितो. आणि हें कर्ज नवें झाल्यांत पूर्वींपेक्षां त्याचें चांगलें होतें, कारण आतां एकाचे (मयताचें) ऐवजी आतां पांच मनुष्यें सांपडलीं आणि मग जसजसे या मुलांस मुलगे होतात व त्या कुटुंबांत मृत्यु होतात तसतसा हा व्यवहार फैलावतो. परंतु हे वारस अडाणी असल्या कारणानें सावकारास असें करितां आलें, नाहींपेक्षा हे वारस हुशार असतात तेव्हां ते सावकारास दिवाणी कोर्ट दाखवितात. सावकाराचे ताब्यांत कायदेशीर रीतीनें झालेला दस्तऐवज असल्या कारणानें तो मयताचे जिनगीवर हुकूमनामा मिळवितो. ( आतां हा हुशार वारस सावकाराचे घरीं कसा पळत जातो हें पाहण्याचें आहे. ) या हुकूमनाम्याचे अमलबारींत ( तो हजार रुपयांचा आहे अशी कल्पना करा. ) दोनशें रुपये किमतीची मयताचीं वावरें जप्त झालीं. ( ही गोष्ट प्रसिद्धपणें माहित आहे कीं, वऱ्हाडी हा आपल्या वडिलोपार्जित जमीनीस कितीही खर्च पडला तरी आपणा जवळून जाऊ देणार नाहीं. कारण दहा रुपये किमतीचे जमीनीचे तुकड्यासाठीं तो ५०० रुपये खर्च करील. ) जप्ती झाल्या नंतर या वारसास सावकाराचे घरीं जाणें भाग पडतें. तो तेथें जाऊन आपले बापाचे कर्जाबद्दलचा पुर्जा सावकारास फिर्यादींत जें व्याज सोडावें लागलें त्यासह एकंदर १२५० रुपयांचा लिहून देतो. आणि त्याच वेळेस जप्तींत असलेलीं वावरें गाहण ठेवितो, परंतु तो अडाणी मनुष्य असें समजत नाहीं कीं, थेडे दिवसांत तीं दोनशें रुपये किमतीचीं वावरेंही जाऊन सदरी लिहिलेले १२५० रुपयांत एक पैही कमी होणार नाहीं. याप्रमाणें तो गरीब मनुष्य फसला जातो, आणि सावकार ह्यास कोणतेही मार्गानें ह्मणजे कोर्टांत जाऊन अगर कोर्ट टाळून फायदाच होतो ह्मणजे त्या च्या असाम्या नुसत्या कायम राहतात इतकेंच नाहीं तर त्यांची संख्या वाढ ी जाते. आमचे अनुभवावरून असें नजरेस आलें आहे कीं, सदरील लिहिलेले प्रकारानें वऱ्हाडांतील शेतकरी लोकांपैकीं एक तृतियांश लोक कर्जदार आहेत.

आह्मांस जी माहिती मिळाली व तहशिलदार लोकांपाशी आह्मी जी चौकशी केली आणि स्वतः शेतकरी लोकांशीं जें संभाषण केलें त्यावरून आह्मी सदरील लिहिलेलें अनुमान केलें आहे.

कुणबी लोकांनीं आपला मोठेपणा व हेवा सोडावा व कर्ज करूंनये अशाबद्दल त्यांजला कितीही उपदेश केलातरी तो निरूपयोगी होईल असें आह्मांस वाटतें. तसेंच सरकारी सारा कमी करणें किंवा तगाई देणें हेंही तितकेंच निरूपयोगी होणार आहे; कारण इतकेंही केलें तरी ते आपले जुने वहिवाटी प्रमाणें काम करून वावराकडे वगैरे दुर्लक्ष करतील ह्मणून त्यांची स्थिति सुधारण्यासाठीं कांहीं करणेंच आहे तर कांहीं कायद्याचा इलाज केला पाहिजे. ह्मणजे असाः—

१ पहिल्यानें शेतकरी लोकांस जें हल्लीं कर्ज आहे त्यातून त्यांला मुक्त करावें.

२ शेतकी करणारास नवीन कर्ज लागेल त्याप्रसंगीं असे उपाय योजावे कीं जेणेंकरून सावकाराचें व असामीचें नुकसान होणार नाहीं.

३ जमीन अशा इलाजानें सुधारावी कीं तेणेंकरून शेती करणारास नफा होईल.

१० शेती करणारांस त्यांचे हल्लींचे कर्जांतून मुक्त करण्यासंबंधी.

या सदरांत इच्छिलेला हेतु अनुभविक जडज नेमून न्यायाचीं कोर्टें स्थापन केलीं असतां तडीस जाईल. सावकारानें आपले असामीवर असलेले दावे आणि विशेषेंकरून कुणबी असामीवर असलेले दावे सहा महिन्यांचे आंत सदरील कोर्टांत दाखल करावे व त्यांत खरोखर उसणवार दिलेल्या पैशाच्या रकमा तसेंच शेतकऱ्यानें उसने घेतलेलें धान्य जें असेल तें स्पष्ट रीतीनें नमूद करावें. व दावे दाखल करण्याचे वेळेस असामीवर जें सर्व घेणें असेल तें त्या वेळेस देणें झालें असो अथवा नसो तें सर्व त्यांत शरीक असलें पाहिजे. या दाव्याबरोबर आरंभापासून तपशीलवार हिशेब व त्याच्या वह्या असाव्या. पक्षकार, त्यांचे मुखत्यार किंवा ते अल्पवयी असले तर त्यांचें पालन करणारे किंवा कायदेशीर वारसे यांणीं हजर रहावें असें केलें पाहिजे. त्याजबद्दल वडील किंवा मुखत्यार असूं नयेत. बरोबर रकमा जमा केल्या आहेत किंवा नाहींत याबद्दल कायदेशीर पुराव्यानें ठराव झाल्यावर मुदल उसने दिलेले रकमेपेक्षां दुप्पट नाहीं अशा रकमेचा किंवा धान्याचा हुकूमनामा द्यावा. प्रतिवादी हा दावा कबूल करो किंवा तक्रार करो प्रत्येक मुकदम्यांत सदरील लिहिले प्रमाणें काम चालावें. प्रतिवादीचे स्थितीचे संबंधानें सदहू हुकूमनाम्याविषयीं फेड करावयाचे सालबंदीनें होण्याची त्या सालबंदीही सदरील हुकूमनाम्यांत नमूद असाव्या.

११ नव्या कर्जाविषयीं व पैसा उसना कोणते रीतीनें घ्यावा व द्यावा याविषयीं योग्य रकमांपुरतें कर्ज काढण्यास मनाई असूंनये परंतु सर्व कर्जास खालीं लिहिलेले नियम लागू असावे.

व्याज दरसाल दरशेकडा ९ रुपयांपेक्षां ज्यास्ती असूं नये, आणि धान्य उसनवारीचे बाबदींत धान्य उसने घेण्याचे वेळेस त्याचा बाजारांत जो भाव असेल त्या भावानें व्यवहार व्हावा, रीतिप्रमणें स्टाप कागदावर झालेले दस्तऐवजा शिवाय दुसरे कोणतेही दस्तऐवजावरून दावा चालूं नये. प्रत्येक करारांत त्याची पुरी होण्याची तारीख स्पष्ट रीतीनें लिहिली पाहिजे, नसेल तर तो करार रद्द समजावा, कारण सावकार लोक आपले मतलबासाठीं कराराची तारीख नमूद करीत नाहींत आणि ते करार तसेच आपल्यास वाटेल तेथपर्यंत राहू देऊन मग त्याबद्दल तगादा करून पहिजे तेव्हां दावा आणतात आणि तेणेंकरून प्रतिवादीचें नुकसान करतात या कारणासाठीं सर्व दस्तऐवजांत रुपये आदा होण्याचा तारीख नमूद करीत जावी,

पैसा देण्याच्या सदरील नेमलेल्या तारखा बहुतकरून फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यांत याव्या कारण या महिन्यांत पीक सोंगलें जातें, हा ठराव करण्याचें कारण असें आहे कीं, ज्या वेळेस असामीजवळ पीक नाहीं त्यावेळची तारीख सावकार पुरजांत घालून घेतो आणि येणेंकरून या रिपोर्टाचे आठवे कलमांत दर्शविले रीतीप्रमाणें त्याचा नाश करितो या कर्जाचे फिर्यादीची मुदत कमी करून एक वर्षाची असावी, कारण कुणबी हा करार केले तारखेस पैसा आदा करीत नाहीं आणि ज्यावेळेस देण्यास त्याजवळ कांहीं नाहीं अशी वेळ पाहून सावकार त्याजवर फिर्याद करितो आणि त्यामुळें कुणबी हा घोटाळ्यांत पडतो, कराराचे तारखे पासून एक वर्षाहून अधिक मुदती पावेतों कर्ज राहूं दिलें तर कुणब्यावर व्याज चढतें परंतु तो त्याची कांहीं काळजी करीत नाहीं आणि अपला पैसा ७ वे कलमांत लिहिलेप्रमाणें खर्च करितो, परंतु सदरील लिहिली मुदत कमी केली तर कुणब्यास व्याज वाचून सावकाराचे कर्जाचा लवकर उलगडा होतो जमीनीचें व उभे पिकाचे विगर कब्जा गाहणाची मनाई असावी. आह्मांस वाटतें कीं, या गोष्टीस हिंदुशास्त्राचें व साधारण कायद्याचें संमत आहे. कारण तेणें करून गरीब निराश्रित शेतकऱ्यांचे अधिक संरक्षण केलें जातें; कारण सावकार हा गहाण ठेविलेला माल फक्त नावानें मात्र घेतो परंतु त्याची किस्तकारी त्याच कुणब्याकडून पूर्वींप्रमाणेंच करितो व आपण नफा घेऊन असामीस बुडवितो. या व्यापारांत असामीला आपला रोजमुरा देखील मिळत नाहीं. परंतु सदरी लिहिलेले उपायामुळें जमीन दुसऱ्याकडे लावून देण्याची एक निराळी रीत निघेल. ती अशी कीं, ती जमीन आपण कुळाकरितां लावून काढणें. अशा रीतीनें ही कांहीं अडचणी येणार आहेत त्या न याव्या यासाठीं जें वावर सावकार कुणब्यापासून आपल्याकडे लावून घेतो त्याजवरील त्याभाडेकऱ्याचा हक्क तो त्याचा कब्जा घेऊन जातीनें लावलेल्या मुदतीपर्यंत किस्तकारी केल्याशिवाय कबूलच करूं नये. असें ठरविल्यानें कपटाचीं गहाणें व कपटाचे पट्टेबंद होऊन सावकाराचा व असामीचा नाश होणार नाहीं. (आमचे समोर जीं जीं कामें चालतात त्यांत अशा प्रकारचें कपट आतांशां पुष्कळ उघडकीस येतें; परंतु त्याबद्दल कायदेशीर पुरावा नसल्यामुळें कांहीं होऊं शकत नाहीं.

सन १८७७चा आक्ट १० कलम२६६ यांत जप्ती माफीचे वस्तूंची याद आहे त्यांत वहीत करण्याची जमीन व उभें पीक हें घालावें कारण कुणब्याचें वावर विकलें गेलें ह्मणजे तो जमीनीविरहित होतो. शिवाय ती योग्य वेळीं न विकली गेल्या कारणानें तिची कमी किंमत येते व प्रतिवादीस जमीन नाहींशी होऊन हुकुमनाम्यांत देवविलेले कर्जाची राहिलेली बाकी त्याजला द्यावी लागतेच व ती देण्यास त्याजजवळ ऐपत नसते. सावकारानें ती जमीन घेतली तर तो जातीनें करूं शकत नाहीं. सबब तिचे मालकास तीं[illegible]नें विकतो. प्रतिवादी हा गरजवंत असतोच परंतु त्याजवळ देण्यास पैसे नसतात. सबब त्या वावराचे किमतीबद्दल तो पुर्जा करून देतो. आणि त्या पुर्ज्याचे रुपये करार केल्याप्रमाणें आदा न झाले ह्मणजे तो सावकार तेंच वावर पुन्हा तिसऱ्यानें विकावयास लावितो. याप्रमाणें कुणबी हा अखेर कर्जांत बुडून आपलें वावर गमावितो. असे प्रकार आह्मी पुष्कळ वेळां पाहिले आहेत.

१२ जमीनीची व शेतकऱ्यांच्या स्थितीची सुधारणा करण्याविषयीं.

गावकरी लोक जितकीं गुरें राखूं शकतील तितक्यांस पुर्ता चारा मिळेल इतकी पडित जमीन प्रत्येक गावास निराळी ठेवावी. तेणेंकरून शेती करणारे लोकांत पूर्वींसारख्या पुष्कळ गायी ठेवण्यास उत्तेजन येईल. व या गाईंची संतती फायेदेवाईक होईल, कारण ती वावरांत कामास उपयोगी पडून जमीनीचें उत्पन्न करण्याचें सामर्थ्य पुन्हा आणण्यास पुरे इतकें खत देईल व तेणेंकरून कुणब्यास पुढें एकंदरींत फायदा होईल. सन १८७१ चा आक्ट २६ यांत जमीन सुधारण्याविषयीं तजविजी आहेत परंतु या आक्टाचा अमल बरोबर होत नाहीं असें दिसतें. सबब तो आक्ट बरोबर अमलांत येऊन त्यांत लिहिलेल्य सुधारणा केल्या पाहिजेत.

( पुढें चालू. )

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ | अकोला रविवार ता० २७ माहे जुलै सन १८७९ इसवी | अंक २९


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## बापू गोखल्याचें चरित्र

जुन्या बखरीचे आधारानें हें नवीन उत्तम पुस्तक रा. रा. शंकर तुकाराम शालिग्राम यांनीं पुण्यास तयार केलेलें आमच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आलें आहे. याची किंमत १ रुपया असून डाकहशील एक आणा आहे. अगदी अलीकडील ह्मणजे पेशवाईअखेरच्या या शूर पुरुषाचें नाव सर्वत्र मशहूर आहे सबब त्याचें यथार्थ व साद्यंत चरित्र बहुतांस वाचावयास व संग्रहीं बाळगण्यास उत्साह असेल ह्मणून आह्मी मुद्दाम याच्या प्रति विक्रीस आणविल्या आहेत. सर्वांस कळावें तारीख १८ माहे डिसेंबर सन १८७८

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## थोर पुरुषांचे आणि स्त्रियांचे पोवाडे.

हें पुस्तक रा. रा. शंकर तुकाराम शालिग्राम यांनीं पुण्यास नुकतेंच छापिलें त्याच्या प्रति वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किंमत दीड रुपया व बाहेर गावीं नेणारास तीन आणे टपालसंबंधी खर्च पडेल

या पुस्तकांत शिवाजी महाराजांचा, निरनिराळ्या पेशव्यांचे, लढायांचे, शूरांचे व सद्गुणी स्त्रियांचे, तसेच पंढरपुर, तुळजापुर, त्र्यंबकटगिरी, पुणें, बेल्दाग, तुळशीबाग, पर्वती यांजवर पवाडे आहेत. कांहीं कांहीं पोवाडे तर एकाच प्रकरणावर कित्येक आहेत, सवाई माधवरावावर २, नानाफडणिसावर २. अहिल्याबाईवर २, खर्ड्याच्या लढाईवर ५, व शेवटच्या राव बाजीवर ८ पोवाडे आहते.

## रामजोशीकृत लावण्या.

ह्या पुस्तकाची प्रथमावृत्ति लवकरच खलास झाल्यामुळें हल्लीं दुसरी आवृत्ति विशेष सुधारून टाइपावर छापविली आहे. प्रथमावृत्तीपेक्षां या खेपेस कांहीं उत्कृष्ठ नवीन लावण्या घालून टीपा वगैरे दिल्या आहेत. त्यांची किंमत पूर्वीप्रमाणें अगदी थोडी ह्मणजे आठ आणे ठेविली असून बाहेरगावीं मात्र टपाल खर्चाबद्दल अर्धा आणा अधिक पडेल. पुस्तकें पुण्यास आमच्याकडे किंवा ज्ञानप्रकाश व शिवाजी छापखान्यांत व मुंबईस इंदुप्रकाश छापखान्यांत मिळतील. कळावें तारीख १८ डिसेंबर सन १८७८ इसवी.

शंकर तुकाराम शालिग्राम.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांतही हीं पुस्तकें विक्रीकरितां आलीं आहेत.

## अनंतफंदीच्या लावण्या.

हीं पुस्तकें रा. रा. शंकर तुकाराम शालिग्राम यांनीं केलेलीं आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आलीं आहेत. यांत अनंतफंदीचा इतिहास, माधवग्रंथ व लावण्या आहेत. याची किंमत आठ आणे आहे. डाक खर्च २ आणे शिवाय पडेल.

## जाहिरात.
## सुबोधसार भाग पहिला.

राजनीति, व्यवहार वगैरेवर ग्रंथांतून अनेक विद्वानांच्या सहायानें नीतिपर, बोधक, मनोरंजक, आणि दृष्टांतीक असे सुभाषित श्लोक आह्मी निवडून त्यांचा सुबोधसार नावाचा ग्रंथ तयार केला आहे. यांत प्रथम श्लोक, त्याचे खालीं प्राकृत अर्थ, व त्याचे खालीं एकंदर श्लोकाचें व अर्थाचें खुलासवार तात्पर्य लिहिलेलें आहे. हा ग्रंथ टाइपानें छापून लवकरच प्रसिद्ध होईल. याची किंमत अगाऊ आठ आणे व बुक बंगी व पोष्टाबद्दल एक आणा एकूण नऊ आणे ठेविली आहे. परंतु जितके वर्गणीदार दिळतील तितक्याच प्रति काढण्याचा इरादा आहे. जे लोक आह्मांस ओळखतात त्यांस पूर्वीं आह्मी दुसरे ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत ह्याची खात्री असल्यानें अगाऊ वर्गणी देण्यास मागें पुढें पहाणार नाहींत; परंतु अपरिचित लोकांनींहि अगाऊ वर्गणी देण्यास शंका घेऊ नये. कारण कांहीं ग्रंथकर्ते अगाऊ वसूल करून स्वस्थ बसतात परंतु तसा प्रकार एथें मुळींच नाहीं, असें आह्मी खात्रीपूर्वक कळवितों. वर्गणीदारांनीं आपलीं नांवें व अगाऊ वर्गणी खालीं सही करणाराकडेस अथवा रा. रा. खंडेराव बाळाजी फडके वऱ्हाडसमाचार कर्ते यांजकडेस द्यावी. कळावें ता. ९ माहे जुलै सन १८७९ इ.

रंगनाथ सखाराम किकवीकर
स्टेशनमास्तर वरणगाव
जिल्हा खानदेश

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि.वि. खालीं लिहिलेल्या च्यार ओळीस आपले सुंदर पत्रीं जागा मिळेल अशी आशा बाळगतों.

बरेच दिवसापासून पर्जन्य नसल्यानें पिकाचा फार खराबा होत चालला आहे. शिवाय उंदीर धाडही सहाय्य आहेच यामुळें लोक फार हवालदील झाले आहेत. दररोज अभ्रें येतात यामुळें लवकरच पर्जन्य पडेल असें दिसतें मग ईश्वर काय करील तें करो. महागाई फार होत चालली आहे. बाजार भाव ज्वारी १० शेर, गहू ७ शेर, तांदुळ ७ शेर, तूप दर रुपयास १॥ शेर येणेंप्रमाणें आहे.

रा. रा. बाळकृष्ण सिताराम जोशी यांस एथील शाळेच्या हेड मास्तरचे जागीं येऊन सात महिने झाले तितक्या मुदतींत त्यांनीं लोकप्रियता बरीच संपादिली. हे आपल्या कामांत दक्ष असत. यांचे कारकीर्दींत शाळेची सुधारणाही झाली. पण अशा गृहस्थाचा वियोग झाला हें पाहून वाईट वाटतें

यांची नेमणूक पुन्हा त्यांचे पूर्व जागीं झाल्यानें ते आपले कामावर रुजू होण्याकरितां निघून गेले. हल्लीं झालेली ही नेमणूक कायमची नाहीं असें कळतें. जर हें खरें असेल तर कायमची व्यवस्था होईल तेव्हां त्यांची पुन्हा एथें नेमणूक होवो असें आह्मी इच्छितों.

एथील शाळेंतील गरीब मुलांचे फीकरितां रा. रा. आनंदराव रामकृष्ण ऊर्फ राव साहेब देशपांडे यांनीं दरमहा सात आणे देण्याचें कबूल केलें. हें त्यानां मोठें भूषण आहे. यांचे प्रमाणें इतर सभ्य गृहस्थही मदत करतील अशी आशा बाळगतों.

गावांतील सडका दुरुस्तीचें काम चाललें आहे. कळावें. लोभ असावा ही विनंती.

देऊळघाट—तारीख १८ जुलै १८७९ इ०

ग्रामस्थ.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. ता. १३ माहे मजकूरचे आपले वऱ्हाडसमाचारात "नेटिव इंजिनियर" या सदराखाली इंजिनियर खात्यांतील नेटिव लोकांस संतोष व अभिमान वाटण्यासारखा मजकूर आपण लिहिलेला मी पाहिला व मला आणि बहुत लोकांस त्याजबद्दल संतोष वाटला. नेटिव लोक बुद्धीनें कमी नाहींत. मोठमोठाल्या सिव्हिल सरव्हिसच्याही परीक्षा युरोपियन लोकांबरोबर बसून आमच्या ध्या व यांत त्यांच्या सारखे आह्मी पास झालों तरच आह्मांस सिव्हिल सरव्हिसमध्यें जागा द्या असें बहुत वर्षे नेटिव लोक सरकारास ह्मणत आहेत पण त्यांची त्याबाबदींत दाद लागत नाहीं. तेव्हां त्या गरीबानीं काय करावें? इतक्या अल्प वयांत इतके लांब विलायतेंत जाण्यास जे संपन्न आहेत त्यांस त्यांच्या वडीलांकडून मोकळीक मिळत नाहीं, कारण तो देश वेगळा, तिकडील हवापाणी वेगळें, तिकडील खाणेंपिणें वेगळें, व धर्म तर अगदीच निराळा ह्मणून इतक्या सर्वांस तोडून त्यांच्यानें मुलांस विलायतेस पाठववत नाहीं. पण अशांची संख्या शंभरांत किंवा हजारांत एक इतकीच; बाकीचे दरीद्र दशेनें व्याप्त ह्मणून त्यांस त्या कामासाठीं दाहा पांच हजार रुपये खर्च येणारा तो मिळण्याचीच पंचाईत ह्मणूनें बुद्धिवान, हुशार, व होतकरू नेटिव लोक जागच्याजागीं थिजून बसतात त्यास इलाज काय? सिव्हिलसरव्हिसची परिक्षा हिंदुस्थानांत घेण्याची सरकार तजवीज योजतें तर नेटिवांच्या योग्यतेची याहून शेकडो उदाहरणें आपल्या व सर्व लोकांच्या नजरेस येती. असो.

नेटिव लोक इंजिनियर कामांत हुशार असे आपले वऱ्हाडांतही कित्येक आहेत त्यांची नावनिशी आपण त्या निबंधांत देता तर बरें होतें. बुलढाणें जिल्ह्यांत रा. रा. रामचंद्र राव हरी लोकलफंड इंजिनियर होते व हल्लीं रा. रा. नारायण बाबाजी जोशी हे आहेत. हे मुख्य इंजिनियरचीं कामें करून चांगले प्रसिद्धीस आलेले आहेत व यांचीं कित्येक चांगलीं कामें त्या जिल्ह्यांत लोकदृष्टीपुढें आहेत. तसेच रा. रा. चिंतो परशराम परचुरे अकोल्यास लोकलफंड इंजिनियर होते त्यांच्या हुशारीची या जिल्ह्यांत प्रख्याती आहे याचप्रमाणें मुख्यत्वानें कामें करण्याचा ज्यांस सरकारानें प्रसंग दिला नाहीं पण करण्यास योग्य असे रा. रा. कृष्णाजी दिनकर सहस्त्रबुद्धे, व रा. रा. वामनराव अनंत भोळे अकोला व उमरावती जिल्ह्याचे सुपरवायझर हे इंजनेरी कामांत उत्तम हुशार आहेत. व त्यांच्या त्या हुशारीमुळेंच सरकारानें त्यांस प्रमोशेनें ( बढती ) दिलीं आहेत. व ते अजून याहून नामांकित होतील. लोकलफंडाकडील ओव्हरसियर रा. रा. सदाशिव विष्णु भागवत हेही यांच्याच तोडीचे हुशार व मोठे बुद्धिवानगृहस्थ आहेत. व या सर्वांनीं इंजनेरी ज्ञान चांगलें संपादन केलेलें आहे. ह्मणून माझी खात्री आहे कीं, या प्रत्येक गृहस्थाकडे काठेवाडांतील रा. रा. गणेश गोविंद याज प्रमाणें वेगळीं वेगळीं कामें स्वतंत्रतेनें सोपवून दिलीं तर ते तीं तशीं वर्णनीय करितील व तेणें करून त्यांच्या गुणाचा बूज होईल. आणि असे लोक वरच्या पदवीस चढविले तर सरकारचीं कामें चांगलीं होऊन यांस युरोपियना इतके मोठे पगार द्यावे न लागतां सरकारचीं कामें होऊन हल्लींच्या रिडक्शन प्रसंगीं सरकारचा फायदाही होऊन नेटिव नावारूपास येतील ह्मणूनही ही गोष्ट विचार करण्यासारखी वाटल्यावरून सुचविली आहे. विस्ताराची माफी असावी. कळावें हे विनंती.

मुा खामगाव ता. २२ जुलै सन १८७९इ० — तुमचा एक पत्र वाचणारा.

वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण शुध्द ८ शके १८०१

## वासुदेव बळवंत फडके धरला.

पुण्याचे पोलिस सुप्रिंटेंडेंट मि० डानियल साहेब या आलिकडील दरवड्याच्या गडबडींत विशेष प्रसिद्धीस आले. त्यानीं दरवडेखोर पकडण्याची पुष्कळ कोशिस केली, दौलतराव रामोशासी लढाई करून त्याला ठार मारिलें, उन्पा तुकाराम रामोसी त्यानीं धरिला व शेवटीं सर्व दंगेखोराचा शिरोमणि वासुदेव बळवंत फडके यासही त्यांनींच धरिलें यावरून त्यांचें नाव आतां सर्वतोमुखी होईल. वऱ्हाडांत पूर्वीं असलेले मि. अबदुलहक्क साहेब व मि० स्टिविन्सन साहेब खामगावचे पोलिस इन्स्पेक्टर यांचीही त्यांनां मदत आहे- असें कळतें; तेव्हा आतां सरकारचे ठरलेले ३००० रूपये बक्षीसहि त्यांनांच मिळेल असें दिसतें. अस्तु. त्यांनीं फडके मजकूर यास कसें धरिलें याविषयींची हकीकत वाचकांस कळण्याची उत्सुकता असेल ह्मणून ती एथें लिहितों.

वासुदेव बळवंत फडके हा फरारी झाल्यापासून डानियल साहेब त्याचे शोधांत होते. आणि पुढें पुढें तर त्याची विशेष प्रसिद्धी झाल्यापासून त्यांनां त्याचा निजध्यास लागला शेवटीं १०।१५ दिवसांपूर्वीं त्यांनां बातमी लागली कीं वासुदेव बळवंत निजाम सरकारचे राज्यांत गनूर ह्मणून शमसुल उमराव साहेबाचा जाहागिरी गाव आहे व तो त्यांनीं रायराय बहादूर यांस दिला आहे त्यांत तो लपून राहिलेला आहे. मग या गोष्टीची खात्री करून घेण्याकरितां त्यांनीं प्रथम एक स्त्री पुण्याहून त्या गावीं पाठविली व तिनें जाऊन चौकशी करून येऊन सांगितलें कीं, गनुरास वासुदेव फडके आहे. मग गवरनर साहेबांस ती गोष्ट कळवून ते तावडतोब हैदराबादेस गेले. तेव्हां गवरनर साहेबानीं गुप्त रीतीचा संख्या संज्ञेचा एक टेलिग्राम रेसिडेंट साहेबांस पाठविला कीं, ही बातमी कोठें न फुटतां त्यांस चांगली मदत मिळावी. रेसिडेंट साहेबांनीं दिवाण साहेब सर सालरजंग यांस ती गोष्ट कळवितांच त्यांनीं सर्व प्रकारें सहाय करण्यास आह्मी सिद्ध आहो असें सांगून आपले कडील पोलिस कमिशनर मि. अबदुल हक्क साहेब यांस त्यांचे बरोबर दिलें. व वऱ्हाडांतील मि० स्टिविन्सन सा. व हैदराबादचे सयद नुर साहेब इन्स्पेक्टरही त्यांनीं बरोबर घेतले आणि कालच्या मागील शनवारीं सकाळीं ते हैदराबादेहून निघून कलबुर्ग्याचे स्टेशनावर उतरून गनूर कडे गेले ते सहा वाजतां जाऊन पोंचले. व अबदुल हक्क हे कलबुर्ग्याहून १०० स्वार व २०० पायदळचे लोक बरोबर घेऊन पाठीमागून गनूरास गेले व त्यानीं गावास घेरा घातला पण तेथें वासुदेव बळवंत सापडला नाहीं. तथापि त्याचे एजंट ९ तरूण ब्राह्मण सापडले. त्यांत रंगो मोरेश्वर नावाचा मनुष्य होता त्यास पुनःपुन्हा विचारल्यावर त्यानें सांगितलें कीं, वासुदेव बळवंत फडके सहा आठवडे या गावीं होता व दोन दिवसांपूर्वीं तो एथून गेला. नंतर मिरा साहेब नावाच्या मनुष्यांनें तो कोणत्या उतारावर भीमा नदी उतरला ती जागा दाखविली मग ही मंडळी तेथूनच नदी उतरून सिद्धनाळ गावीं गेली. तेथें वासुदेवाचा साथी गोपाळराव रात्रौ वस्तीस होता असें समजलें मग पुढें अंकलगीस गेले तेथें समजलें कीं, तो उलुरास गेला व दोनप्रहरी कुळकर्ण्याकडे जेवणास होता. पुढें तेथून निघाले ते कित्येक खेडीं शोधीत शोधीत देवल नडगी या गावीं गेले. तेथें गावाबाहेरचे देवळाचे पडवींत वासुदेव बळवंत व त्याचा सोबती गोपाळराव निजले होते. डानियल साहेब व त्यांची मंडळी यांनीं त्या गावास जाण्याचे अगोदर तीन मैल मागें आपली वाहनें ठेविलीं व कंदीलही लपवून घेऊन सोमवारच्या पाहटेस तीन वाजतां देवल नडगीच्या देवळांत जाऊन डानियल साहेबानीं वासुदेव यास निजल्या ठिकाणीं धरिलें. तेव्हां तो भयाभीत होऊन गयावया करू लागला. व गोपाळराव तरवार उपसीत होता परंतु डानियल साहेबानीं गुद्दा मारून ती दूर झुगारली. नंतर दोघाही कैदीस बांधूं लागले तेव्हां गोपाळरावानें अबदुल हक्क यांचे हाताचें एक बोट दातांनीं फोडिलें. मग स्टिविन्सन साहेब व सयद नूर पोलिस इन्स्पेक्टर यांनीं दोघासही चऱ्हाटानीं आवळून बांधिलें. व उजेडतांनां दुधनीच्या स्टेशनावर त्यांस आणून बुधवारीं पहाटें ४ वाजतां पुण्यास आणिलें. गोपाळरावानें डानियल साहेबांस सुगाव्याची माहिती सांगितली नाहीं व वासुदेव बळवंत एक अक्षर बोलला नाहीं. त्यानें दाढी ठेविली आहे. व वेष बदलण्याचे कित्येक पोशाग त्याजवळ सापडले व कांहीं कागद पत्र सापडले आहेत त्यांत त्याचे वागणुकीचे नियम, लढाईचे बेतबात वगैरे पुष्कळ गोष्टी लिहिलेल्या आहेत असें ह्मणतात.

पुण्याच्या सेशनांत २० दरवडेखोरांची चौकशी झाली त्यांत उन्या तुकाराम ह्मणून एक रामोशी आहे त्याला फाशींची शिक्षा ठरली आहे त्यानें माजिस्त्रेटापुढें कबूल जबाब दिला आहे त्यांत वासुदेव बळवंत फडक्या विषयीं असें सांगितलें आहे कीं, दौलतराव रामोशाची टोळी कोकणांत जावयास निघाली त्यापूर्वीं वासुदेव बळवंत त्या टोळींत होता व त्याचे सोबती ३ ब्राह्मण अगदीं तरूण मिसरू फुटले न फुटलेले असें होते. त्यांचीं नावें, गोपाळपंत, विष्णुपंत व आया- हे तिघे लुटीचें द्रव्य पुण्यास किंवा लपवून ठेवच्या जागीं जाऊन नेऊन ठेवित असत. वासुदेव बळवंत यास सर्व जण महाराज ह्मणत असत. त्याचा नियम होता कीं, टोळींत बंदूक बाळगणारास दरमहा १६ रूपये, तरवार बाळगणारास १५ रूपये, व सोडगीं बाळगणारास ९ रूपये पगार द्यावयाचा. पगाराची वाटणी दर १५ दिवशीं करावयाची. बायकांच्या अंगावरील व मुलाच्या अंगावरील दागिने चोरावयाचे नाहींत. पुढें पळस्प्याकडे ही टोळी जातांनां तो पुण्याकडे गेला तो पुन्हा परत आला नाहीं. यावरून असें दिसतें कीं, तेव्हांपासूनच तो इकडे मोंगलाईंत शिरला. निजाम सरकारचे पोलिसाकडून अशीही खबर समजली कीं, तो ५०० आरब व रोहिले तैनातीस ठेवण्याच्या विचारांत होता. व त्यांचे जमादारास त्यानें २००० रूपये अगाऊ खर्चास दिले होते व घोडे खरेदी करण्याकरितां ३००० रूपये देण्याचा ठराव केला होता व ती रकम आणण्याकरितां तो पंढरपुरास येत होता. ही गोष्ट खरी असेल व उन्या रामोशाची हकीकत खरी असेल तर वासुदेव बळवंत फडके याचे बेतबाताची व उद्योगाची कांहीं विशेष कडी होती व तो केवळ दरवडे घालून तृप्त रहाणार नव्हता, विशेष साहस करण्याचा त्याचा इरादा होता. परंतु ईश्वरकृपेनें त्याचे ते बेत सिद्धीस जाऊन विशेष गडबड होण्यापूर्वीं तो धरला गेला- हें फार चांगलें झालें. शांतीच्या राज्यांत अशी गडबड नको आहे. ह्मणून ती करणारे उत्पन्न होतील तेव्हां तेव्हां त्यांस पकडणारेही ईश्वर असेच पाठवून त्यांस शासन करील. व आह्मा गरीब प्रजेस निरंतर सुख देईल व त्याप्रमाणें सर्वकाळ घडो असें आह्मी इच्छितों.

## दक्षिणेंतील रयतेची स्थिति सुधारण्याचा कायदा.

दक्षिणेंतील रयत फार नादारीस आली आहे. तिजजवळ कांहीं त्राण राहिलें नाहीं. सावकार मारवाडी यांच्या कर्जानें त्रासून त्यानीं सन १८७५ सालीं त्यांवर गर्दी केली होती, पुढें दुष्काळ एक दोन वर्षे चालू राहिला. अलीकडे दरोडे पडूं लागले इत्यादि प्रकारानें रयत जिगजिग होऊन गेली व सावकार लोक तिला फार छळतात असें सरकारासही वाटूं लागलें ह्मणून सरकारानें हल्लीं कायद्याचा एक मसुदा तयार केला आहे. व तो हिंदुस्थान सरकारचे कायदे कौन्सलांत आनरबल मि. होप साहेब यानीं गेल्या आठवड्यांत सादर केला. त्यांतील कलमांचें थोडक्यांत हशील प्रसिद्ध झालें आहे तें असें:--

१. शेतकरी लोकांचे संबंधानें जे दस्त ऐवज लिहून घेण्यांत येतील ते प्रत्येक खेड्यांतील रजिस्ट्रार याणीं लिहिलेले असून त्यांचे आफिसांत नोंदले गेले पाहिजेत, व जे दस्त ऐवज ह्याप्रमाणें लिहिले गेले नसतील, व नोंदले गेले नसतील ते कोर्टांत पुराव्यास घेतले जाणार नाहींत.

२. सावकारानें कुळास प्रत्येक वर्षाचे अखेर आपले हिशेबाची नक्कल दिली पाहिजे, व वसूल आलेल्या रकमांबद्दल पावती दिली पाहिजे. जो सावकार ही गोष्ट करणार नाहीं तो कायद्याप्रमाणें गुन्हेगार समजला जाऊन त्यास कांहीं शिक्षा करण्यांत येईल.

३. शेतकरी लोकांचे विरुद्ध जे दिवाणी दावे करण्यांत येतात त्यांचा निकाल करण्यास्तव सरकार मार्फत पंच नेमण्यांत येतील, व हे पंच वादी आणि प्रतिवादी यांची आपआपसांत समजूत करण्याचा प्रयत्न करतील. पंच मार्फत न तुटल्यास वादीनें आपला दावा दिवाणी कोडतांत सुरू करावा. पंचासमोर वाटाघाट होऊन आपसांत समजूत होत नाहीं अशाविषयीं कोर्टाची खात्री झाल्या शिवाय कोर्टानें शेतकरी लोकांचे विरुद्ध दिवाणी फिर्यादी दाखल करूं नयेत.

४. ल्वाद कोर्टाचे संबंधानें अद्याप अखेरचा ठराव ठरण्यांत आला नाहीं, परंतु हल्लीं असा ठराव झाला आहे कीं, ज्या ज्या ठिकाणचे पाटील हुशार असतील त्या त्या ठिकाणीं १० रूपयेपर्यंत दाव्यांचा निकाल करण्याचा अधिकार पाटलांस देण्यांत यावा.

५. सर्व सबार्डिनेट जज्जांस स्माल काज कोर्टाचे अधिकार देऊन हा अधिकार अशा रीतीनें वाढविण्यांत यावा कीं, त्यांत गहाणाचे दाव्यांचा समावेश होऊं शकेल.

६. सबार्डिनेट जज्जास जो अधिकार द्यावयाचा तो ५०० रूपयेपर्यंत असावा. हा अधिकार पहिल्या नंबरचा होय. दुसऱ्या नंबरचा अधिकार १० रूपयेपर्यंत असावा, व उभय पक्षकरांनीं कबूल केल्यास हा अधिकार ५०० रूपयेपर्यंत चालावा.

७. कोर्टाचे न्यायदृष्टीस ज्या ज्या प्रसंगीं अवश्य दिसेल त्या त्या प्रसंगीं कोर्टानें दाव्यांतील रकमेच्या संबंधानें रोखे होण्याचे पूर्वीं जी हकीकत घडली असेल त्या हकीकतीची चौकशी करावी ह्मणजे कर्ज रोख्यांत जी रक्कम नमुद झाली असेल तीच प्रत्येक ठिकाणीं खरी आहे असें न समजतां ती कशी कशी जुळत गेली याचा तपास करावा.

८. मुंबई इलाख्यांत जो मुदतीचा कायदा पूर्वीं सुरू होता तो फिरून अमलांत यावा.

९ कर्जाचे रकमेबद्दल प्रतिवादीस वारंटावर धरून दिवाणी तुरुंगांत ठेविलें जाऊं नये.

१० ज्या कर्जांचे फेडीस्तव विशेष जमीन स्पष्ट रीतीनें गहाण लावून दिली असेल त्याच कर्जाबद्दल ती जमीन हुकूमनाम्यांचे बजावणींत विकली जावी. इतर प्रसंगीं बजावणीचे कामांत जमीनीची विक्री होऊं नये.

११ हातावरील कर्जाच्या संबंधानें जमीनीवर हुकूमनाम्याची बजावणी करणें झाल्यास सदहू जमीन सात वर्षांच्या मुदतीनें वहिवाटली जाऊन जें उत्पन्न होईल तें कर्जाचे फेडीस घालावें.

१२ सर्व सबार्डिनेट जज्जांस नादार ठरविण्याचा हक्क द्यावा.

१३ कूळ अथवा सावकार ह्या उभयतां पैकीं कोणीहि अर्ज केल्यास सदहू अर्जावरून नादार ठरविण्याची चौकशी व्हावी.

१४ भावी मिळकतीच्या संबंधानें जबाबदारी ठेवणें झाल्यास ती सात वर्षांचे वर ठेविली जाऊ नये.

१५ ह्या नवीन कायद्याप्रमाणें जे ठराव होतील त्यांजवर अपील चालूं नये, परंतु सदहू ठरावांची तपासणी स्पेशल जज्ज व त्यांचे असिस्टंट यांस करितां यावी.

१६ सबार्डिनेट जज्जांची संख्या हल्लीं २४ आहे ती ३६ पर्यंत वाढविली जावी.

१७ लहान लहान मोकदमे पाहून वकील नेमण्याचे कामास कांहीं इयत्ता ठरविण्यांत यावी.

## झुलू लोकांचा पराभव

झुलू लोकांचा राजा सेटेवियो हा तह करण्याच्या विचारांत आहे. व त्याला ब्रिटिश सरकारानें कांहीं कलमें कळविलीं आहेत तीं मान्य करून तो लवकरच लढाई मिटवील

असें मागें वाटलें होतें पण आतां गा आठवड्यांत ज्या तारेंतून खबरा आल्या आहेत त्यांवरून समजतें कीं सेटेवियो राजानें सरकारच्या शर्ती कबूल केल्या नाहींत त्यावरून ब्रिटिश सेनापति जनरल लार्ड क्लेम्सफोर्ड साहेब यांनीं लढाईची तयारी करून या महिन्याच्या तिसरे तारखेस मोलासी नदी ओलांडून जाऊन त्यांस अळंदी गावाजवळ गाठिलें. राजा बरोबर झुलू लोक २०००० होते व ब्रिटिश सैन्य ४०६२ युरोपियन व ११०३ नेटिव शिपाइ व तोफा ८ इतकें होतें. त्यांनीं चवथे तारखेस त्या २० हजारांवर चाल करून मोठी बाणीची लढाइ दिली व सर्व झुलू लोकांचा पराभव करून त्यांस रानोमाळ पळविलें. व अळंदी गाव हस्तगत करून घेतला. झुलू लोक एक हजार ठार मेले व इंग्लिश सरकारचे १० लोक मेले व ५३ जखमी झाले असें कळतें.

आतां झुलू लोक बरेच नाउमेद झाले आहेत. व राजाचें मनांतही तह करावा असें आलें आहे. १६ वे तारखेस सर गार्नेट वुलसली साहेब राजाचे भेटीस जाणार आहेत व त्या वेळीं तहनामा होऊन लढाई बहुधा संपेल असें त्यांनीं विलायतेस लिहून कळविलें आहे.

## पिकापाण्याची हकीकत

हिंदुस्थान सरकार दरआठवड्यास सर्व ठिकाणची पिकापाण्याची खबर कळावी ह्मणून तारेंतून बातमी मागवितात व ती प्रसिद्ध करितात त्याप्रमाणें या महिन्याच्या दुसऱ्या आठवड्याची ह्मणजे तारीख १५ जुलैपर्यंतची बातमी आली आहे ती अशी:—

मद्रास इलाक्यांत पिकाचा धजाव बरा आहे. परंतु कर्नूल, कोइमतूर, आणि तिनवेलीकडे पाऊस पाहिजे आहे. ह्मैसुराकडे हलका पाऊस सर्वत्र बराच पडला. कोलाराकडे मात्र नाहीं. तेथें फार जरूर आहे. पिकें सुधरत आहेत. मुंबई इलाख्यांस या आठवड्यांत थोडा पाऊस पडला. पिकें अजून बरीं आहेत, परंतु मागें दिसत होतीं तशीं नाहींत. गेल्या आठवड्यांत ज्या जिल्ह्यांत महामारीचा आजार असल्याची खबर होती तेथें तेथें या आठवड्यांतही तो आहे, व सिंध प्रांताकडे फार आहे. मध्यप्रांताकडे या आठवड्यांत ८ जिल्ह्यांत पाऊस पुष्कळ पडला व बाकीच्यांत थोडा पडला. तेथें अधिक पाहिजे आहे. पेरणी कित्येक जिल्ह्यांत पुरी झाली व कांहीं जिल्ह्यांत पिकें बरींच वर आलीं आहेत. बंगाल्यांत पाऊस व धारण बरी आहे. वऱ्हाडांत पाऊस जरूर पाहिजे आहे. कांहीं तालुक्यांत टोळासारखे किडे होऊन ते पेऱ्याचे खराबे करूं लागले आहेत. मध्यहिंदुस्थानांत नवगांग, भुपाळ, आणि सतना या जिल्ह्यांतून पाऊस चांगला पडला, बाकी जिल्ह्यांत कमी पडला तेथें आणखी पाहिजे आहे. रजपूत संस्थानांत इकडे थोडा तिकडे थोडा असा उडत उडत पाऊस पडला. पिकें बरीं आहेत. बंगाल इलाख्यांत सर्वत्र पाऊस पडला. पूर्व आणि उत्तर भागास व बिहार प्रांतांत फारच पडला. तेथें उघाडी होईल तर चांगली. पण बर्द्वान आणि सिंगभुम जिल्ह्यांत आणखी पाऊस पाहिजे. हळवे भाताची स्थिति नीट नाहीं. पुढील भात चांगलें येईल. पुष्कळ जिल्ह्यांतून महामारीचा उपद्रव आहे पण बलसोर जिल्ह्यांत कमी आहे. आसाम प्रांतांत पाऊस चांगला झाला. तेथें दोन्ही प्रकारची भातें चांगलीं येतील. ब्रह्म देशांत फार मोठा पाऊस पडला. तिकडे गुरांनां रोग झाला आहे. वायव्य प्रांत व अयोध्या यांत पाऊस आहे. जमीन फार सर्द होऊन कामें चालत नाहींत त्यासाठीं उघाडी होईल तर चांगली. अलाहाबादेकडे तर बीं पेरलेलें कुजत आहे. पंजाब प्रांतांत पाऊस बरा आहे. महामारी अजून कोठें कोठें आहे.

---

इलिचपुरच्या १९ वे तारखेच्या वऱ्हाडमित्रांत "क्ष" या सहीचें एक पत्र छापिलें आहे. त्यांत वऱ्हाडांतील च्यारी पत्रांस असा प्रश्न आहे कीं पत्रव्यवहारा खालीं "या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळून असतात असें कोणी समजू नये" असें किंवा अशा अर्थाचें लिहिणें असतें त्याचा अर्थ काय? व या संबंधानें खुलासा करून घेण्याकरितां त्यानें नवे जुने प्रेस आक्ट पाहिलें व त्यांत त्यांला आधार सापडला नाहीं. व असें सदर असलें तरी कायद्याप्रमाणें न्यायाअंतीं पत्र प्रसिद्धकर्ता मूळ आरोपी किंवा साह्यकर्ता होईलच, मग यापासून अर्थ व फायदा काय?

आतां या विषयीं इतरांचें मत काय असेल तें असो पण आमचें जें मत आणि जो हेतु आहे तो नुसतें तें आमचें सदर वाचलें असतांच कळण्या जोगा आहे असें असतां "क्ष" स तो कळला नाहीं व कायदे पहाण्याच्या आणि आरोप शाबीद करण्याच्या भानगडींत तो पडला आहे तशी कांहींच गरज नव्हती.

आमच्या पत्रव्यवहाराखालीं असा शेरा असतो कीं "या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये" यावरून उघड दिसून यावें कीं मजकुराविषयीं किंवा कायद्याच्या आरोपाच्या बचावाविषयी तो लेख नाहीं. फक्त मताविषयीं आहे. आणि त्याचा अर्थ इतकाच की, आलेल्या पत्रांतील प्रसिद्ध होणारे सर्व मजकूर सर्वकाल आमच्या स्वतांच्या मतास मिळूनच असतात असें कोणी समजूं नये. ह्मणजे त्यांतील मतें कधीं आमच्या मताशी मिळती असतात व कधीं विरुद्ध असतात. एडिटोरियल कालमांत जें आह्मी प्रतिपादन करितों त्यास अनुकूळ व कधीं प्रतिकूळ असेही लेख कोणी आह्मांकडे पाठवितात व त्यांचीं तीं मतें लोकांस कळावीं व आमच्या मताविरुद्ध कोणी कांहीं लिहिलें तर तेंही प्रसिद्ध होण्यास स्थान असावें या साठीं तो पत्रव्यवहाराचा भाग आहे. कायद्यापासून बचाव करून घेण्याचा त्यांत कांहीं मुद्दा नाहीं असें आह्मीही समजतो. सारांश त्या आमच्या सदरांत "मिळूनच असतील असें समजू नये" ह्मणून लिहिण्यांत "च" चा जो उपयोग केल्ला आहे त्यावरून विचारपूर्वक पाहिलें असतां इलिचपुरच्या "क्ष" ची व तशा दुसऱ्या पृच्छकांची समजूत होईल असें आह्मांस वाटतें.

---

कलादगी एथून २० वे तारखेचें पत्र आलें त्यावरून कळतें कीं तेथें एक दिवस १२ तास पावेतो पाऊस पडत होता व तेणेंकरून शेतांतून घुशीचा उपद्रव झाला होता तो आपोआप नाहींसा झाला. ह्मणजे घुशीचे लोधचे लोध मरून पडलेले शेकडो दृष्टीस पडूं लागले. यावरून त्यांच्या बिळांत पाणी जाऊन तेथेंही हजारो घुशी मेल्या असतील. व त्या ठिकाणचा येणेंकरून हा त्रास संपला असेल तर फार उत्तम झालें. ईश्वराची करणी विचित्र आहे! त्याला वाटलें कीं लोकांस पीडा व्हावी तर तो घुशी उत्पन्न करितो, नंतर लोकावर कृपा करावी असे त्याला वाटलें तर तो मोठा पर्जन्य पाडून घुशीचा नाश करितो! यावरून त्याचें प्रभुत्व ओळखावें व मनुष्यमात्रानीं त्याला विन असावें हेंच मुख्यें कर्तव्य होय.

---

## वऱ्हाड.

---

याही आठवड्यांत परवा शुक्रवारीं दिवसां रात्रीं व काल सकाळ संध्याकाळीं व आज पहाटे चांगला पाऊस पडला येणेंकरून लोकांचे तोंडावर मोठी टवटवी आली आहे. कारण खरीपाचे पिकाची मोठी काळजी उत्पन्न झाली होती ती या पावसानें प्रस्तुत बरीच दूर झाली.

---

कर्नल बुशबी साहेब बुलढाण्याचे डिपुटी कामिशनर २४ वे तारखेस रजेवरून परत आले.

---

मे. मेकंजी साहेब इलिचपुरचे डिपुटी कमिशनर यांस ३ महिन्यांची हक्काची रजा मिळाली व २३ वे तारखेस ते इकडून विलायतेस जाण्याकरितां मुंबईस गेले.

---

मे. थामसन साहेब बुलढाण्याचे असिस्टंट कमिशनर यानीं पावणे तीन महिन्यांची रजा मागितली आहे.

---

दर्यापुरचे तहशिलदार मि. यादअली यानीं पेनशन घेतले व त्यांचे जागेवर मि. बदोदीन यांस तहशीलदार नेमिलें.

---

एथें नेमलेले नवीन चीफ कानस्टेबल मि. एकराम हुसेन येऊन आपले कामावर रुजु झाले.

---

एथें विदूर जातीचा एक मनुष्य गेले मंगळवारीं वांती व जुलाब होऊन मरण पावला त्यावरून थोरल्या बाईच्या आगमनाची दहशत वाटली होती पण पुढें दुसरें कोठें कांहीं हाल चाल दिसून न आल्यावरून संतोष वाटतो.

---

गेले आठवड्यांतील सूर्यग्रहण अभ्रामुळें एथें दिसलें नाहीं. त्याचप्रमाणें उमरावतीसही दिसलें नाहीं.

---

सांगलीकर नाटककार मंडळींनीं गेले शनिवारचें नाटक श्री राजेश्वराकरितां केलें, त्याला ६१ रु. उत्पन्न झालें. काल त्यांनीं हरिश्चंद्र नाटक चांगलें केलें.

---

मुलींच्या शाळेला म्युनिसिप्यालिटीकडून महिना १२॥ रुपये मिळावयाचे त्याप्रमाणें काल तीन महिन्यांचा पगार मिळाला. पूर्वी ८ वर्षे ही शाळा व आणखी दोन शाळा म्युनिसिप्यालिटीनें चालविल्या होत्या. व गुदस्त सालीं उत्पन्न कमी ह्मणून रकम बंद केली तेव्हां ग्रामस्थांनीं ही शाळा अकोल्यास असणें अवश्यक ह्मणून म्युनिसिप्यानिसिप्यालिटीस सुस्थिति येईपर्यंत वर्गणीनें पुन्हा सुरूं केली. व सहा महिन्यांची वर्गणी जमा करून विद्याखात्याकडे मदत मागितली. तिकडून पाहिल्याप्रमाणें मदत मिळाली व याच सुमारास म्युनिसिप्यालिटीकडेही क्यांटनमेंटचें, गाडीपट्टीचें, कान्सरवन्सीचें वगैरे उत्पन्न वाढलें ह्मणून पूर्ववत् मदत द्यावी ह्मणून म्युनिसिप्यालिटीला मुलीच्या शाळाकमिटीनें विनंति केली व ती म्युनिसिप्यालिटीनें कबूल केली. आणि त्याप्रमाणें ही रकम मिळूं लागली हें पाहून आह्मास संतोष वाटतो.

---

उमरावतीची आगगाडी टपालास गैरसोयीची झाली आहे त्याकरितां तेथील टपाल आणण्या पोचविण्याची त्या खात्याकडून निराळी तजवीज झाली आहे.

---

( रेसिडेन्सी आर्डरवरून )

मि० टी रंगराव रेसिडेंट साहेबाचे असिस्टंटा (अस्याची) यांस तारीख १७ जुलाई पासून वऱ्हाडांत सिविल खात्याकडे दिले. व उमरावतीस जाण्या विषयीं हुकूम झाला.

मि० सयद नुरुदीन खान रेसिडेंट साहेबांचे अस्याची यांस रेसिडेन्सी बाजारेच असिस्टंट सुपर इंटेंडेंट नेमिलें. व थर्ड क्लास माजिस्त्रेटचे त्यांस आधकार दिले. आणि २५ रुपयेपर्यंत स्माल काज कोर्टाचे आणि ७५ रुपये पर्यंत मुनसिफ कोर्टाचेही त्यांस अधिकार दिले. त्यांवर अपिलें बाजार सुप्रिंटेंडेंटकडे होतलि.

अकोल्याची पेंठ वाढविण्या करितां विठ्ठल बाळकृष्ण याचा इनाम नंबर ५ एकर २९ गुंठ्यांचा व आकार रुपये साडेनऊचा सार्वजनिक कामाकरितां घेण्यांत आला.

मि० एम जे स्कोबी पश्चिम वऱ्हाडांतील असिस्टंट इंजिनियर यांस दोन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

क्या० ई जे गनत्राप साहेब थर्डक्लास डिस्ट्रिक्ट पोलिस सुप्रिंटेंडेंट रजेवरून परत आले सबब मि० एच ए हिथ साहेब पुन्हा ४ थे क्लासचे डिस्ट्रिक्ट पोलिस सुप्रिंटेंडेंट झाले.

मि० महमद यासीनखान साहेब थर्ड क्लास असिस्टंट कामिशनर यांस उमरावती जिल्ह्याकडून इलिचपुर जिल्ह्याकडे तूर्तातूर्त दिलें आहे.

---

## वर्तमानसार.

भोंदू देव मामलेदार —मंडलेश्वर एथून एक ग्रहस्थ लिहितात कीं, यशवंतराव महादेव देव मामलेदार या नांवाचे एक साधू ता० ६ मिनहुरोजीं दोन घटका रात्रीचे सुमारास मंडलेश्वरीं येऊन बाबा साहेब जाहागीरदार यांचे मंदिरांत उतरले. जाहागीरदार साहेब यांणीं देव मामलेदार ह्मणून त्यांची सरबराई जेवणखाण खेरीजकरून चांगली ठेविली. ही खबर गावांतील लोकांस समजल्यावर दुसरे दिवशीं प्रातःकाळीं बनासे, क-

लाकंद, मिठाई यांचीं तबकें घेऊन देव मामलेदार यांचे दर्शनाकरितां झुंडीच्या झुंडी जाऊं लागल्या. मंदिरांत इतकी अतिशय गर्दी होऊन गेली कीं, वृद्ध, अशक्त व गरीब दुबळे लोकांस तर महाराजांचें तोंडही दृष्टीस पडण्याची मुष्किल झाली. गांवांतील बहुतेक संभावित लोक व दुसरे गरीब वगैरे महाराजांचे पायां पडून प्रसाद वांटण्याची धूम झाली. याप्रमाणें सकाळचे नऊ वाजेपर्यंत क्रम चालल्यावर खानदेशांतील दोनचार जण महाराजांचें दर्शन घेण्याकारितां मंदिरांत गेल्यावर महाराज यांस पहातांच हे देव मामलेदार नाहींत असें त्यांनीं ओळखिलें व लोकांस पायां न पडण्याविषयीं सांगितलें परंतु लोकांची खात्री होईना. तेव्हां बोवांचें नांव गांव गोत्र नोकरी कोठें कली वगैरे बोवांस विचारलें, परंतु बोवांचें पायां पडून घेण्याकडे व दक्षिणा मिळविण्याकडे लक्ष लागलें होतें. शेवटीं कांहीं वेळ वाट पाहून सक्तीनें विचारल्यावर मी देव मामलेदार नाहीं व ब्राह्मणही नाहीं. माझें नांव मात्र यशवंतराव आहे असें बोवानीं सांगितलें तेव्हां बोवांचे पायां पडून घेण्याचें व मुलें देण्याचें काम बंद पडून बोवांनीं गाशा गुंडाळिला.

[illegible] हवा व पाणी हितकारक आहे हे बहुधा सर्वांस ठाऊक आहे. परंतु आपल्या राहाण्याच्या ठिकाणांतली हवा व पिण्याचें पाणी स्वच्छ ठेवण्याविषयीं आमचे लोकांकडून फारच दुर्लक्ष होतें त्यांत हवोविषयीं तर मुळींच लक्ष नसतें असें ह्मटल्यास चिंता नाहीं. घराचे आसपास घाण मुळीं काढून टाकणें घरांतील भिंती स्वच्छ ठेवून हवा खुली फिरूं देणें इत्यादि गोष्टींकडेस असावें तसें लक्ष नसतें. इतरांपेक्षां दुखणाइतास स्वच्छ हवा व प्रकृतीस हित करणारीं इतर साधनें यांचीं फार अवश्यकता असते. ह्मणून याविषयीं एका ग्रंथांत खालीं लिहिलेले नियम सांगितले आहेत त्यांचा सारांश या ठिकाणीं सांगतो :—

१. खोलींत हवा स्वच्छ ठेऊन वेळोवेळीं सुवास येण्याकरितां, अगरबत्ती, धूप अथवा ऊद जाळावा.

२. प्रत्येक दिवशीं थोडी ताजीं फुलें किंवा कांहीं नवीन वस्तू आणीत जावी. कांहींच नसल्यास हिरवीं पानें तरी नजरेपुढें लावावीं.

३. आजारी मनुष्याच्या मनास त्रास येण्याजोगें त्याच्यासमक्ष कांहीं बोलूं नये, परंतु जेणेंकरून त्याच्या वेदना व दुःख यांपासून त्याचे विचार दूर होतील, व त्याचें मन खुष होऊन शांत राहील, अशा विषयांवर बोलत असावें.

४. तुला खावयास काय पाहिजे असें दुखणाइतास कधींही विचारूं नये. जें खाल्यानें त्यास इजा होणार नाहीं असा पदार्थ त्यानें होऊन मागितला तर तो त्यास द्यावा परंतु एकाच वेळेस पुष्कळ देऊं नये, [illegible] र्णे खाण्याचा जिन्नस स्वच्छ भांड्यांत थोडासा आणून दिल्यानें जसें क्षुधेचें समाधान होतें तसें एकदम पुष्कळ आणिल्यानें होत नाहीं, तर उलटा तो खाण्यास कंटाळा येतो.

५. आजारी मनुष्यें अयुक्तिक भाषणें कारितील हें सिद्धच आहे. क्षुल्लक कारणावरून त्यांस राग येतो व ते संतापतात. असल्या वेळेस ते कोणास काय बोलतील याचा त्यांस सुमार नसतो हें त्यांचें बोलणें निमुटपणें ऐकून घेतलें पाहिजे. सु० प०

—मुंबई इलाख्यांत सरकारी हापिसांतून कोठें कोठें कसा कसा खर्च कमी करावयाचा याचा विचार करून तो अमलांत आणण्याचे कामावर मि० जे. बी. पील यांची नेमणूक झाल्याची बातमी आहे.

गेल्या आठवड्यांत विलायतेहून आलेली डाक लंडन एथून निघाल्यापासून १६ दिवस व पांच तासांत येथें येऊन पोंचली. इतक्या अल्प काळांत विलायतची डांक आजपर्यंत कधीं आली नव्हती.

चिनांत कित्येक प्रदेशांत दुष्काळाचीं चिन्हें दिसत आहेत

मुंबई इलाख्यांत गरीब लोकांच्या पोटासाठीं सुरू केलेल्या कामांवर एकंदर ३४,२०० मनुष्यें आहेत व काम करवत नाहीं अशा १०,८०० लोकांस धर्मार्थ पोटास देण्यांत येत आहे व ६००० मनुष्यें कांठेवाडांतील रेलवेच्या कामावर लागलीं आहेत

इंदापुराकडील लोकांची स्थिति पाहण्यासाठीं गवरनर साहेब नुकतें तिकडे गेले आहेत

✓ दरोड्याच्या संबंधानें सेशन कमिटें झालेल्या वीस आरोप्यांपैकीं, नेर, चिखली. व पळस्पें एथें दरोडे घातल्याबद्दल ७ असामींस जन्म पर्यंत काळे पाण्याची शिक्षा झाली व या सातांपैकीं पळस्पें एथें दरोडा घालणारे दोन असामीस फांशीची शिक्षा झाली. बाकी राहिल्यापैकीं आणखी तीन असामींस जन्मपर्यंत काळे पाण्याची शिक्षा झाली. नऊ असामींस तीन तीन वर्षांची शिक्षा झाली व एक सुटला.

सातारा, बेळगाव वगैरे प्रदेशांत पीकपाण्याचा हवाल चांगल्या प्रकारचा आहे.

आह्मांस लिंहिण्यास आनंद वाटतो कीं, धुळें येथील प्रसिद्ध गरुड घराण्यांतील रा. रा. वामनराव रामचंद्र या नावाचे गृहस्थ इंदूर एथें श्री० महाराज होळकर सरकार यांचे पदरीं नायब दिवाण आहेत, त्यांनीं आज सुमारें १५ वर्षें सरकारापाशीं फार मेहेनतीनें आपल्या जीवित्वाकडे कांहीं न पाहतां नोकरी केली, व हरएक प्रसंगी महाराजांस फार मदत केली, त्यामुळें महाराजांनीं प्रसन्न होऊन त्यांजला एक गाव ३,२५० एकर जमीनीचा सालीना खर्चवेच जाऊन निवळ ६२५ रु० उत्पन्नाचा व शिवाय सरदेशमुखीच्या गुमास्तिगिरीबद्दल ६१ रुपये दरसाल येणेंप्रमाणें वंशपरंपरेनें इनाम स्वदस्तुरचा लेख करून दिला.

स्तुत्य गोष्ट— कोणी रघुपतराव कृष्ण या नावाचे रेलवे कंत्राटदार आहेत त्यांनीं धोंड स्टेशना नजीक नवीन दोन इमारती, एक दवाखान्या करितां व दुसरी लायब्ररी करितां, अशा बांधल्या आहेत. या दोन्ही इमारतीस एकंदर ५००० रुपये खर्च लागला. शिवाय दवाखान्याप्रीत्यर्थ हे गृहस्थ दर महा ५० रुपये खर्च करित असतात. या गृहस्थांनीं [illegible] भिक्षागृहही बांधलें आहे, तेथे दररोज सुमार १०० दुबळ्या अनाथ लोकांस अन्नपाणी मिळत असतें. शिवाय या गृहस्थांनीं या दुबळ्या लोकांपैकीं मोठ्या पुरुषांस प्रत्येकीं १ घोंगडी, १ बंडी, १ धोतर; बायकांस १ लुगडे चोळी. व मुलांस १ धोतर, १ बंडी येप्रमाणें धर्मादाय केला आहे. परमेश्वर या गृहस्थांचें कल्याण करो.

मांडले येथें रेसिडेन्सीकारितां नवीन जागा पाहवयाची असून रेसिडेंटाचें रक्षण करण्याकरितां ५०० गार्ड अधिक वाढवावयाचा सरकारचा विचार आहे.

मि० वुइल्यिम मार्शाल नावाचा ग्लासगो येथील व्यापारी थोड्या रोजांपूर्वीं ८७ वर्षांचा होऊन वारला. त्यानें आपल्या मागें आपल्या नावाचे विद्यालय ग्लासगो येथें स्थापण्याकरितां २० लक्ष रुपये ठेविल्याचें कळतें असे महात्मे आमच्यांत किती सांपडतील बरें !

नागपुर— "कालिदास पुणेंकर हिंदु स्त्रीमिश्रित नाटक मंडळी" येथें येऊन तिचे पांच सहा खेळ झाले. मंडळीचें प्रयोगकुशलत्व वर्णनीय आहे. आजपर्यंत जीं नाटकें एथें आलीं त्यांत यांचा दर्जा पहिला लागेल. पात्रें स्वकर्मनिपुण आणि अभिनयशौंड आहेत; परंतु स्त्रीपात्रें अगदीं निरुपयुक्त आहेत. इं. प्र.

✓ बुधवार व विश्रामबाग वाड्याचे जाळित संबंधानें पोलिसाच्या पुन्हा बारीक तपासांत पकडलेल्या तीन इसमांची चौकशी सिटी माजिस्त्रेट मि. प्लंकेट यांजपुढें गेल्या शुक्रवारीं सुरू झाली. या खटल्यांत सदर्हू जाळिताबद्दल जन्मपर्यंत काळेपाण्याची कैद झालेले मुख्य बुक डेपोकीपर कृष्णाजी नारायण रानडे यांचा जबाब झाला असून पुढें चौकशी चालू आहे. पकडलेल्या तीन इसमांचीं नांवें बाळाजी नारायण फडके, विष्णु बळवंत खरे व मोरो बळवंत खरे अशीं आहेत ह्मणून कळतें.

मेजवानी— खा. ब. दस्तुर नसरवानजी जामास्पजी यांणीं आपल्या "दस्तुर" बंगल्यांत ता. १६ मिनहू रोजीं ने. ना. कम्यांडर इन् चीफ साहेब यांस मोठी मेजवानी दिली.

पुणें— गेल्या शनवारीं सूर्य ग्रहणाचा योग होता. दोन प्रहरानंतर बरोबर १ वाजून ४८ मिनिटांनीं ग्रहण लागून ३ वाजून ५१ मिनिटांनीं सुटलें. ग्रहणाचे संबंधानें जे सिद्धांत प्रसिद्ध झाले होते त्यांत जो फेरफार दिसून आला तो असा कीं, ग्रह लाघव व नाटिकल आल्मन्याक गणिताचा आधार पाहतां अनुक्रमें २४ व ४ अशा मिनिटांनीं स्पर्शकाल उशिरां झाला, व तसेंच अनुक्रमें ७ मिनिटे पूर्वीं व ३ मिनिटे उशिरानें असा मोक्षकाल झाला. टॅभूकर ज्योतिषि यांच्या सिद्धांतांतलि वेळ घेतां ११ मिनिटें पूर्वीं स्पर्शकाल होऊन ९ मिनिटें आधींच मोक्षकाल झाला. ज्ञा. प्र.

---

## शेतकरी लोकांच स्थिती-विषयीं द. बहिमनजी जा. सी. आय. ई. यांचा रिपोर्ट.

(मागील अंकावरून पुढें चालू)

ह्मणजे त्या आक्टाचे पहिले भागांत सांगितलेल्या सर्व सुधारणांसाठीं तगाई दिली जावी. तसेंच सदरील आक्टाचे दुसरे भागांतील कलम पांच तागाईत सतरा पावेतों यांत जी कलेक्टरची चौकशी सांगितली आहे यापुळें फार हरकत होते. आणि सावकाराकडून भारी व्याजानें उसने घेतले रकमेचे उपयोगापेक्षां त्या तगाईच्या रकमेचा उपयोग कमी होतो. कारण सावकाराची रकम त्यांनां योग्य वेळीं उपयोगास मिळते." सबब सदर्हू चौकशी इतकी संक्षिप्त असावी कीं, तेणेंकडून योग्य वेळीं तगाई देतां यावी. आणि या चौकशी संबंधी कलेकटराचे अधिकार असिस्टंट कमिशनर व तहाशिलदार यांजला द्यावेत व त्यांनीं तालुक्यांत पाहणीस फिरत असतां जागचे जागीं चौकशी करावी व या कामगारांस तगाई देण्याचा अधिकारही द्यावा. याचप्रमाणें कलमें ७।९ आणि १० हीं अधिक सुलभ केलीं पाहित. तगाईची रकम सरकारी साऱ्याचे रकमेप्रमाणें समजावी व जर जमीन, तिचें पीक, आणि इतर माल मिळकत हीं सरकारी साऱ्याप्रमाणेंच तगाईचे वसुलासाठीं विक्रीस पात्र होतील तर कलम १० यांत सांगितलेले चौकशीची जरूर राहणार नाहीं. आणि या रिपोर्टाचे कलम ११ यांत सांगितल्याप्रमाणें जमीनीवरील गहाणाची व इतर प्रकारची जबाबदारी काढून टाकली गेल्यामुळें अर्थातच सरकारचा हक्क सर्व जमीनीवर बिनजोखमी राहील.

जमीन तयार करण्यासाठीं निंदणें वगैरे किस्तकारिचे संबंधानें सालीना जें जें काम करावें लागतें तें या आक्टाचे पहिले भागांत लिहिलेल्या सुधारणांत येत नसेल तर त्यांत अशा प्रकारचे ठराव करावे कीं, सदरीं लिहिलेल्या सुधारणांचा समावेश त्यांत होईल. व त्या कामासाठीं प्रत्येक सालीं तगाई देत जावी. कारण शेतकऱ्यांस प्रत्येक वेळीं आपले सावकाराकडे जाण्याचें कारण सदरीं लिहिलेल्या खर्चाबद्दलच उत्पन्न होत असतें; आणि ती गरज सरकारच पुरवील तर शेतकऱ्यांस फसले जाण्यासाठीं आपले सावकाराकडे क्वचितच जावें लागेल. आतां हें खरें आहे कीं, सदरी लिहिल्याप्रमाणें करण्यास लाखो रुपये लागतील परंतु ते सर्व वसूल होण्यास कांहीं अडचण येईल असें आह्मांस वाटत नाहीं. कारण सन १८५३ सालांत हे जिल्हे इंग्रज सरकारास दिले गेले तेव्हां दोन वर्षें पावेतों मोगलाई रिवाजा प्रमाणें प्रत्येक गावीं तगाई दिली गेली होती आणि ती यत्किंचितही श्रमाशिवाय वसूल झाली. तेव्हां सारांश असा कीं या आक्टांत डिपुटि कमिशनर साहेबाचे हुकुमावरून तगाई देण्याचा अधिकार तहशिलदारांस देऊन त्यांनीं रोखे लिहून घेत जावे असें ठरलें तर सदर्हू प्रकार अधिक सुलभ होईल.

१३ वहितीचे कारणासाठीं तगाई द्यावयाची असेल तेव्हां खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें पाहिजे.

१ सदरीं लिहिल्याप्रमाणें दुरुस्ती.
२ निंदणें व बी बेणें वगैरे बद्दलचे खर्च प्रत्येक सालीं करावे लागतात त्यांबद्दल.

अकोला स्मालकाज कोर्ट,
२१ एप्रिल १८७९

(सही) बाहिमनजी जामासजी सी. आय. ई.
जज्ज स्मालकाज कोर्ट
अकोला.

हें पत्र अकोल्या एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.